# श्री साईलीला



" तो पहा तुमचा घोडा कुंपणापलीकडे चरतोय "



जून

६० पैसे

१९७५

# अनुक्रमणिका – जून १९७५


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | — | आस्तिक |
| २) | साईभक्त श्री. माधवराव निमकर | — | श्री. चन्द्रकांत सामन्त |
| ३) | श्रीसाईभेट | — | श्री. बी. आर. काकडे |
| ४) | इन्नलाहा अल्ला कुल्ले शौइन खदीर | — | डॉ. अनील जायस्वाल |
| ५) | प्रेमीभक्त बिल्वमंगल | — | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ६) | साईबोधामृत | — | श्री. द. शं. टिपणीस |
| ७) | श्रीसाईनाथ चरित्र | — | श्री. र. श्री. पुजारी |
| ८) | शिरर्डीचा रामनवमी उत्सव | — | |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्री साई वाक्सुधा

कोण कांहीं मागूं येतां । अधिकार पाहती संत प्रथमता ।
जैसी जयाची योग्यायोग्यता । तैसेंच त्यातें देती ते ॥ ७४ ॥
ज्या मनीं रात्रंदिन । देहाभिमान विषय चिंतन ।
त्या गुरूपदेशाचा शीण । व्यर्थ नागवण उभयार्थां ॥ ७५ ॥
चित्तशुद्धि जाहल्यावीण । परमार्थी रिघूं पाहे जो आपण ।
ज्ञानगर्वाची ती मिरवण । केवळ शीण तो खरा ॥ ७६ ॥
यास्तव रुचेल तेंच बोलावें । पचेल तितुकेंचि अन्न खावें ।
नातरी व्यर्थ अजीर्ण व्हावें । हें तों ठावें सकळिकां ॥ ७७ ॥
माझा भांडार भरपूर आहे । देईन जो जो जें जें चाहे ।
परि ग्राहकाची शक्ति पाहें । देतों मी साहे तेंच कीं ॥ ७८ ॥

—श्रीसाईसच्चरित्—अध्याय १७ वा


## श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५४ वे ] जून १९७५ [ अंक ३

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६-०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

*

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय

# आस्तिक

सध्याचे युग विज्ञानाचे युग आहे. मानव चंद्रावर जाऊन पोहचला आहे. कवी-कल्पनेमधील चंद्र किंवा देव-कोटीतील चंद्राचे खरे स्वरूप मानवाला दिसले आहे. आतापर्यंतच्या ज्या श्रद्धा मानवाने उराशी बाळगल्या होत्या त्या सगळ्या पोकळ वल्गना ठरल्या आहेत. असेच किती तरी शोध विज्ञानाने लावले आहेत आणि वरचेवर मानवाने कल्पिलेल्या देव देवतांच्या कल्पना वल्गना ठरत आहेत. आणि मानव बऱ्याच प्रमाणात नास्तीकतेकडे झुकला आहे. तरी पण ही नास्तिकता कशा प्रकारची असते. ती हृदयाच्या कुठपर्यंत जाऊन पोहचली आहे ! किंवा मानव खरोखरच अंतःकरणाने संपूर्णतः नास्तिक होत चालला आहे काय ? ह्याचे उत्तर तर आपण आपल्याच मनात शोधले तर फारच मजेदार होईल.

आजचा बराचसा सुशिक्षित नास्तिक बनत चालला आहे असे तरुण पिढीला संबोधून म्हटले जाते, ते किती प्रमाणात बरोबर आहे त्याचे निरीक्षण केले तर बऱ्याच प्रमाणात आपला गैरसमज होण्याची शक्यता आहे. कारण आजच्या वैज्ञानिक युगात नास्तिकवादाचा केवळ बाह्य देखावा दाखवला जात आहे, आणि नास्तिकतेच्या बुरख्याखाली मानव जास्तच आस्तीक बनत आलेला आहे. त्याच्या मनात देवांच्या अस्तित्वाबद्दलचा विश्वास अधिकाधिक दृढ होत चालला आहे. म्हणूनच सुशिक्षित लोकांमध्येच देवांच्या भजनी लागण्याचे प्रमाण जास्त प्रमाणात वाढत आहे. अंधश्रद्धेवर आणि सामान्य लोकांच्या देवभोळेपणावर हसणारे सुशिक्षितच देवावर जास्त विश्वास टाकू लागले आहेत. आणि म्हणूनच देवाच्या दारी येणाऱ्यात ह्या विज्ञाननिष्ठ लोकांचाही बराच मोठा वर्ग असतो.

आजचा सुशिक्षित, किंवा बुद्धिजीवी वर्ग काय ! किंवा सामान्य वारकरी लोक काय दोघेही शेवटी माणूस आहेत ! थोडेसे वर वर जरी देवांच्या अस्तित्वाबद्दल शंका येत असली तरी आत हृदयात कोठे तरी मात्र देवांच्या अस्तित्वाचा अंश असतोच आणि वेळ पालटली, संकटे आली किंवा पाप समोर दिसू लागले की, ती भावना उसळून बाहेर येते आणि त्या लहानशा बिंदूचे मोठ्या तळ्यात रुपांतर होते आणि मग तो आस्तीकतेमध्ये पुरेपुर बुडतो. मानवाने कितीही प्रयत्न केला तरी हजारो पिढ्यापासून त्याच्या मनावर होत असलेले संस्कार पुसले जात नाहीत. परिस्थितीच्या ओघात जर ते संस्कार पुसट झालेले असले तरीही त्यांचे अस्तीत्व सतत जाणवत राहतेच आणि वेळ आल्यास ते अधिक गडद होतात. नास्तीकपणाचा कितीही आव आणला तरी शेवटी त्यांचे आस्तीकत्व बाहेर पडतेच.

सध्याच्या यांत्रिकी जीवनातला माणूस वैफल्य, नैराश्य ह्यांनी त्याच्या जीवनात थैमान घातले आहे. आपल्या ह्या जीवनास वैतागून तो देवालाही शिव्या देतो. त्याच्या अस्तीत्वाबद्दल कसेही बोलतो, पण शेवटी त्याचेही हात नकळत जोडले जातात ते देवापुढेच. दिवसभर देवाबद्दल,

त्याच्या अस्तीत्वाबद्दल, विरुद्ध ओरडणारा माणूसही चोरूनच का होईना देवापुढे हात जोडीतच असतो. त्याच्या मनावरचे संस्कार कितीही पुसले तरी पुसले जात नाहीत. मग नुसत्या नास्तीकवादाच्या वलगना का म्हणून आम्ही बाळगतो? निव्वळ वैतागाने, संतापाने आणि शेवटी देवालाच माणूस शरण जातो. का? तर ती माणसाची सहज प्रवृत्ती असते म्हणूनच!

कित्येकदा ह्या आस्तीकवादात श्रद्धेचाच भाग मोठा असतो. त्या श्रद्धेवरच तो जगतो. माणसाने एका दगडाला श्रद्धा अर्पण करून त्याला देव बनवले आहे. वास्तविक तो देव एक दगडच असतो. पण त्यावरील भावना, श्रद्धा मोठ्या असतात. आणि त्या श्रद्धेमुळेच दगडालाही देवपण येत असते. काहीही असो, मात्र आजच्या मानवाची सहज प्रवृत्ती मात्र जास्तच आस्तीक बनत चालल्याचे दिसून येत आहे.

भारतीयांचे तर सोडा, पण पाश्चात्य संस्कृतीमध्ये तरी काय आढळून येत आहे? सगळे वैभव दारी लोळत असतानाही त्यांना आत्मिक समाधान मिळत नाही, म्हणून ते भारतीय संस्कृतीचा अभ्यास करणाऱ्यासाठी येथे येत आहेत. 'हरे रामा हरे कृष्णा' हाच त्या लोकांचा नारा होय. ह्याच पाश्चात्य विचार प्रवाहामधून हिप्पी लोकांचा उदय झाला आहे. किती विचित्र वाटते पहा! एकीकडे हेच लोक चंद्रावर जातात, सगळ्या ग्रह-ताऱ्यांचा शोध घेऊन आतापर्यंतच्या जुन्या धार्मिक कल्पनांचे अस्तीत्व, समजुती खोट्या ठरवतात आणि तेच लोक दुसरीकडे अध्यात्मिक सुखाच्या शोधात परदेशी जातात. तेथील संस्कृतीचा अभ्यास करतात. केवढी प्रचंड विसंगती! म्हणजे एक मोठे कोडे आहे? एकीकडे तो आस्तीकवादावर कडाडून हल्ला करतो आणि दुसरीकडे मात्र लाखो रुपये धर्मभावनेच्या प्रचारासाठी खर्च करतो. मानवाच्या स्वभावाचे अनाकलनीय गूढ त्याच्या ह्या स्वभावात आहे.

मानव खरोखरच नास्तीकवादाकडून आस्तिकतेकडे झुकण्याचे कारण बऱ्याच अंशी त्याच्या ह्या अस्थिर परिस्थितीवर अवलंबून आहे. बदलत्या परिस्थितीने, त्रस्त जीवनाने त्याला नकोसे करून सोडले आहे; आणि सामाजिक, कौटुंबिक विवंचनेमुळे तो सतत वैतागत असला, त्याची प्रवृत्ती नास्तिकपणाकडे झुकत असली तरी तो असतो आस्तिकच. देवाचे नाव घेतले की त्याला मानसिक समाधान लाभते, मन शांत होते. हीच त्याच्या आस्तिकपणाची किल्ली! शेवटी सामान्य माणूस देवावरच अवलंबून असतो तो खरोखरच का असतो ही गोष्ट वेगळी कारण माणूस स्वभावच तशा प्रकारचा असतो. कोणी आस्तिक वादावर विश्वास ठेवो वा नास्तिकपणावर ठेवो, मन मानवाच्या मनावरील आस्तिकतेची पक्कड जगाच्या अंतापर्यंत नाहीशी होणार नाही कारण "ही उदासी मितभाषी जोगीण मान टेकून दरवाजाच्या खांभावरती बसली आहे वाट अडवून प्रवेशाच्या पायरीवर"

अशीच आमची, तुमची अवस्था आहे.

गाठीभेटी : ११

## श्री. माधव सखाराम निमकर उर्फ 'साईदास'

लेः- चंद्रकांत दामोदर सामंत

श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेल्या व त्यांच्या अनुग्रहास पात्र झालेल्या व्यक्ति-विषयींची माहिती, तसेच त्यांचे अनुभव आपण अनेकदा मोठ्या श्रद्धेने वाचतो व ऐकतो. असे अनुभव साधकांना निश्चितपणे मार्गदर्शक ठरत असतात. तसेच काही व्यक्तिंना जरी प्रत्यक्ष श्रीसाईनाथांचा दर्शनयोग घडलेला नसला तरी त्यांचे जीवन श्रीबाबांमुळे इतके प्रभावित व परिपूर्ण झालेले असते की केवळ दर्शन न झाल्याने त्यांच्या श्रीसाईभक्तित बिलकूल उणेपणा जाणवत नाही. अशाच प्रकारच्या विद्यमान भक्तांपैकी एक श्री. माधवराव निमकर हे होत.

प्रखर जाज्वल्य श्रीसाईभक्ति कशी काय असू शकते ह्याचे चालते बोलते प्रतीक म्हणजे श्री. निमकर. स्वतःविषयींचा उल्लेख ते कटाक्षाने श्री बाबांचा 'दास' अथवा 'गुलाम' असाच करतात. आणि ह्या त्यांच्या उद्गारातच त्यांच्या समर्पित जीवनाचे सार भरलेले आहे.

१९१९-२० सालचा काळ. तेव्हा संतश्रेष्ठ दासगणूंची कीर्तने मुंबईच्या सांताक्रुझ, पार्ले, अंधेरी भागात होत असत. दासगणूंच्या कीर्तनाची नेहमीची पद्धती म्हणजे उघड्या मैदानात पुढ्यात एका धाबळीवर श्रीबाबांची तसबीर ठेवून तेथे जमलेल्या जनसमुदायाला ते आपल्या रसाळ वाणीने भक्तिरसात आकंठ बुडवीत. श्री. निमकर ह्या कीर्तनांना न चुकता हजर राहत. आपल्यालाही असे कीर्तन करता यावे असे त्यांना मनोमन वाटत असे. अर्थात त्या दृष्टीने त्यांची कोणतीच तयारी नव्हती. मात्र एक हौस म्हणून ते अधूनमधून नाटकात कामे करीत. सुमारे १९४५ साली श्री. निमकरांना श्रीबाबांनी स्वप्नात दर्शन देऊन विचारले, "पोरा, तुला नाटकात नाचता येते तर मग कीर्तन का करीत नाहीस ?" पुन्हा आठ एक दिवसांनी तसाच दृष्टान्त झाल्यानंतर मात्र श्री. निमकरांनी लौकरात लौकर संधी साधून पूर्वतयारी शिवाय श्री दासगणू कृत "श्री ज्ञानेश्वर चरित्र" ह्या विषयावर एका जाहीर समारंभात कीर्तन केले व तेव्हापासून आजतागायत त्यांनी हा उपक्रम चालू ठेविला आहे. दासगणूंच्या शिकवणीनुसार श्री. निमकर कीर्तनाची वेगळी बिदागी न घेता केवळ आरतीत जमलेल्या पैशाचा स्वीकार करतात. "श्रीबाबांची प्रसिद्धी हीच त्यांची भक्ती" ह्या दासगणूंच्या बोलण्याचा ठसा श्री. निमकरांच्या मनावर खोल उमटला आहे. श्री. निमकर सध्या ८२ वर्षांचे आहेत. श्रीसाईकृपेच्या अनेक गोष्टी त्यांच्या तोंडून ऐकावयास मिळतात. भावना वेगाने

बारंवार त्याचा गळा दाटून येतो व मग काही वेळ त्यांना पुढे बोलणे कठीण होऊन बसते.

श्रीसाईबाबांचे समकालीन असूनही त्यांना प्रत्यक्ष न पहाण्यास मिळाल्याची चुटपूट श्री निमकरांना पूर्वी फार लागत असे. एकदा असेच ते कांदेवाडीतील स्वतः-च्या "भागवत बोर्डींग व लॉजिंग" ह्या खाणावळीत बसले असता दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास एक ठेंगणासा गृहस्थ त्यांच्या खाणावळीत जेवण्यास आला. वाढप्याने त्याच्या पुढ्यात वाढलेले ताट नेऊन ठेविले. त्या अनोळखी गृहस्थाने अल्पावधीत पहिला भात संपविला व तो एकाएकी बाहेर निघून गेला. इतर उपस्थित मंडळींना त्याच्या त्या कृतीचे आश्चर्य वाटले. श्री. निमकरांनी लगेच बाहेर जाऊन आजूबाजूला शोध केला पण तो गृहस्थ परत काही दिसला नाही. त्याच रात्री बाबांनी निमकरांच्या स्वप्नात जाऊन विचारले, "पोरा आज मी जेऊन गेलो की नाही ?"

१९४४ च्या एप्रिलमध्ये मुंबईच्या गोदीत प्रचंड स्फोट झाले त्यावेळेस श्री. निमकर बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या कचेरीत स्वतःच्या टेबलावर काम करीत होते. त्यांच्या डाव्या हाताला बसणारे श्री. पोतदार हे जागच्या जागीच ठार झाले व त्यांच्या प्रेताचाही मागमूस लागला नाही. उजव्या हाताला बसलेले श्री. शृंगारपुरे हे जबर जखमी झाले व हॉस्पिटलच्या वाटेवरच त्यांचा अंत झाला. मधे बसलेले श्री. निमकर त्या प्राणघातक हल्ल्यातून वाचले. त्यांच्या अंगात काचांचे तुकडे गेले होते. पण केवळ श्री साईबाबांच्या उदीने त्यांच्या जखमा कालांतराने डॉक्टरी उपायाशिवाय आपोआप बऱ्या झाल्या.

महाराष्ट्राचे प्रसिद्ध कीर्तनकार कोपरकरबुवा ह्यांचाही एक अनुभव सांगण्या-सारखा आहे. कांदेवाडीत १९३७ ते १९६२ ह्या काळात श्री. निमकर नोकरी व्यतिरिक्त खाणावळही चालवीत असत. श्री. कोपरकरबुवा त्यांच्या खाणावळीत भोजनास जात असत. एकदा कोपरकरबुवांचे सांधे एकाएकी धरले व त्यांना उठणे-बसणे अवघड झाले. श्री. निमकरांच्या ध्यानी ही गोष्ट येताच त्यांनी श्रीबाबांचे स्मरण करून त्यांचा उदीप्रसाद कोपरकर बुवांच्या अंगाला लाविला, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे एक फर्लांगभर पुढे गेल्यावर त्यांच्या अंगातून एक विजेची लहर चमकून गेली व तात्काळ त्यांचे अवयव पूर्ववत् झाले.

श्री. निमकरांनी आपल्या दीर्घ आयुष्यात श्रीसाईकृपेचे अनेक चमत्कार अनुभविले आहेत. इतके असूनही त्यांच्या ठिकाणी मीपणा किंचित् औषधालासुद्धा सापडत नाही. "परमार्थात भक्तिव्यवहारात नीति-व संसारात विरक्ति" हे श्री. निमकरांच्या श्रीसाईभक्तिचे सूत्र आहे.

* *

# " श्रीसाई-भेट "

लेखक—बी. आर. काकडे

ॐ नमोजी सद्गुरु परब्रम्ह ॥
तू निर्विकल्प कल्पद्रुम ॥
हर हृदय विश्राम—धाम ॥
निजमूर्ती राम—तूं स्वयें ॥
तूझा अनुग्रह जया घडे ॥
तया नाही कांहीं सांकडे ॥
दर्शने मोक्षद्वार उघडे ॥
तूझेनी पडिपाडे तूंची तू ॥

वर प्रमाणे मधूर स्वरात ॐ कार ऐकू येत होता. कीर्तनास अमाप जन समुदाव जमला होता. केवढा मोठा मंडप केवढी मोठी श्रीसाईंची तसवीर व कीर्तनकारही केवढे मोठे ? परंतु टाचणी पडली तर तिचा आवाज ऐकू येईल एवढी शांतता ! कीर्तनकारांचा पुढील आवाज ऐकू येऊ लागला तसतसा श्रोतृवर्ग अधिकाधिक उत्सुक दिसू लागला. कोर्तनकार सर्वगुण संपन्न—सर्वभाषिक—सर्वज्ञाति दिसल्याने त्यांचे पुढील वाक्य मोठ्याने खालीलप्रमाणे ऐकू येत होते:—

दरबार साईंनो दिव्य छे—दिल साफ लईने आवजो ॥
प्रेमनी गंगा वहे छे—आनंद उरमा लावजो ॥
श्रीमंत के पंडीत हो—वळी रंकराणा भूप हो ॥
गृहस्थाईनो दमाम हो—पण पाक दिलथी आवजो ॥
अमरधाम छे दरबार साईंनो—निर्मळ बुद्धी राखजो ॥
पागल पुकारे साई साई—दिल रंज कदि न राखशो ॥
श्री कृष्णानी बंसी उपर—गोपी बधी घेली बनी ॥
पागल बनो साईनामपर–पागल बनीने आवजो ॥

या प्रमाणे श्रीसद्गुरू साईबाबांचा जयघोष ऐकून श्रोतृवर्गाचे मन कळवळले व किर्तन संपल्यावर काही लोकानी कीर्तनकारास एक शंका विचारली :- हे महान भक्त ! आपण आपले किर्तनातून श्री साईनामाचा जो जयघोष केलात तो ऐकून आमचे मन द्रवले. परंतु " पागल बनो साईनाम पर " याचा स्पष्ट उलगडा आमचे मनाशी होत नाही. कारण जोपर्यंत आम्ही या संसारात गुंतलो आहोत व संसारातील सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडता पाडता आम्हास वेड लागण्याची पाळी येते तेव्हा अशावेळी आणखी आम्ही कोणत्या प्रकारे " पागल " बनावे कीं जेणें करून " श्री साई भेट " होऊ शकेल.

कीर्तनकारही काही साधेसुधे इसम नव्हते, गणूदास महाराजाप्रमाणे त्यांचीही श्री साईबाबांवर " अढळ श्रद्धा " होती. त्यांनी श्रोतृवर्गांपैकी ज्या लोकानीं शंका विचारली होती त्यांची समजूत अती गोड भाषेत घालून किर्तनकार पुढे म्हणाले —:

इस जिंदगिमें – जिंदगीसे – जिंदगी मिलती ॥
कभी राहत – कभी उल्फत जहाँ पर इसीसे मिलती ॥
न पानाथा मैंने – जिंदगी क्या चीज है इसमे ॥
कभी हमदर्द – कभी दुःखदर्द – कहानी इसीसे मिलती ॥

याप्रमाणे काव्य ऐकवल्यावर त्या जनसमुदायातून एक फकीर आला होता. तो पुढे येऊन अती गोड शब्दात त्या कीर्तनकारांचे कौतुक करून पुढे म्हणाला : हे कीर्तनकार तुमची काय समजूत करणार ! तुम्ही मजकडे पहा ! मी एक साधा फकीर आहे.

मी ना देव – ना ईश्वर ॥
मी ना अनल हक्क – ना परमेश्वर
यादे हक्क – मी यादगार ॥
बंदा मी लाचार – अल्लाचा ॥

याप्रमाणे भक्त मंडळीस सांगून तो फकीर पुढे म्हणाला :–

करमरकर मेरे हाल – पर तू करीम ॥
तेरा नाम रहीमान है – और रहीम ॥
तूंही दोनो आलमका – सुलतान है ॥
जहाँ में नूमाया तेरी शान है ॥
फन्दा होनेवाला है – सब कारोभार ॥
रहे नूर – तेरा – सदा आशकार है ॥
तू आसीकका सदा मददगार है ।

संसाररूपी लोखंडाला – जोपर्यंत भक्तीरूपी अग्नीचे दर्शन होत नाही – सहवास होत नाही – स्पर्श होत नाही – एकमेकास ते भेटत नाहीत तोपावेतो तुम्ही विचारलेली शंका बरोबर आहे. कारण पागल बनणे म्हणावे तितके सोपे नाही. पागल बनणे म्हणजे एकात्मरूप होण्याचा प्रयत्न करणे. मी " व तू " हा भेदभाव विसरून मीठ व पाणी ज्यावेळी एकमेकास भेटतात त्यावेळी त्यांची. जी स्थिती होते तीच परिस्थिती " पागल बनो साईनाम परची होईल याप्रमाणे तो फकीर बोलून एकदम जनसमुदायामध्ये अदृश्य झाला. जनसमुदाय मोठया विवंचनेत पडला व खरोखरीच की काय ? श्रीसाईबाबा भेटावयास आले होते का ? याबद्दलची शंका चाटून गेली.

दुसरे दिवशी किर्तनास अमाप गर्दी झाली होती. एक दिलाने, एकाचित्ताने सर्व जनसमुदाय कीर्तनकाराचे किर्तन ऐकण्यात दंग झालेला दिसत होता. कीर्तनकाराने श्री साईबाबावरच पुढे बोलण्यास सुरुवात केली:—

साईबाबा देजो दर्शन—तमारो हुं भिकारी छुं ॥
करो मुझ रंक पर करुणा—तमारो हुं भिकारी छुं ॥ध्रु० ॥
दर्शन देवा जरा आवो—दयाळू केम तलसावो ॥
दया लावो—दया लावो तमारो हुं भिकारी छुं ॥ १ ॥
हजारो नामना नामी—पधारो सत्यना स्वामी ॥
तमारी जोइए कृपा—तमारो हुं भिकारी छुं ॥ २ ॥
मुकी जशो मने ज्यारे—देशना बांधवो त्यारे ॥
तम्हे चढ्जो म्हारी म्हारे—तमारो हुं भिकारी छुं ॥ ३ ॥
अमारी बुद्धी शुद्ध करजो—हृदयमां आवीने वसजो ॥
बधा अपराध क्षमा करजो—तमारो हुं भिकारी छुं ॥ ४ ॥

याप्रमाणे श्री साईबाबांचे **विनंती रुप** काव्य चालले होते. भक्तजन एकाग्र चित्ताने शांतपणे श्रवण करीत होते. ज्याप्रमाणे प्रभू श्रीरामचंद्राचे चरित्र कीर्तन ज्या ज्या ठिकाणी चालते त्या त्या ठिकाणी " श्री हनुमंत " हजर असतात. त्याचप्रमाणे श्री साईबाबांचे किर्तन ज्या ज्या वेळी व ज्या ठिकाणी चालू असते त्या त्या वेळी व त्या ठिकाणी बाबा स्वतः कोणतेही रूपात – किंवा फकीराचे वेषात येऊन भेट देतात अशी किर्तनकारांची ठाम समजूत होती व म्हणूनच की काय आज कीर्तन संपल्यावर किर्तनकार मोठ्या आशेने मोठ्या उत्सुकतेने बाबांची वाट पहात होते. परंतु आज तो फकीर आलाही नाही व भक्त समुदायास दिसलाही नाही. किर्तनकार आपले काही भक्त परिवारासह रस्त्याने जात असताना त्यांना पुढील आवाज ऐकू आला :–

एक पैसा अगर कोई देगा मुझे ॥
सो गालीया सूना दूंगा ॥
और मोहरू हजारो जो दान करे ॥
दुनियाका भेद बता दूंगा ॥

भक्त परिवार कीर्तनकारास म्हणाले – ! पहा ! कालचाच तो फकीर. आपण त्याला गाठू या ! याप्रमाणे किर्तनकार व भक्त परिवार त्या फकीराजवळ जाऊन अति नम्रतेने नमस्कार करून म्हणाले :– साई ! आज आपण किर्तनास आला नाहीत. आम्हास मोठे कोडे पडले होते व मन थोडे नाराज झाले होते. परंतु आपणास आता रस्त्याने जाताना पाहून फार फार आनंद झाला. महाराज आपण आमचे बरोबर आमचे घरी चलावे. त्यावर तो फकीर या लोकांना काय म्हणाला :–

मैं कौन ? कहांका ? आप कौन ? हमे ना घर ना संसार ! हम दुनियामें "**उस अल्लाका**" नाम लेते लेते ही जींदगी काट रहे है. यावर त्या कीर्तनकाराचे हृदय फार भरून आले व त्यांनी सर्वांदेखत त्या फकीराचे पाय घट्ट धरले. कीर्तनकार पुढे बोलू लागले:—

**कुठे तूज पाहू साईनाथा ॥**
**साईबाबा...साईनाथा ॥ ध्रु० ॥**
**नयन शिणले—भान हरपले ॥**
**आतूर झाली—भेटीसाठी ॥ १ ॥**
**हा भवसागर—पार करुनिया ॥**
**तव चरणांची—भेटी व्हाया ॥ २ ॥**
**दास काली विनवी—कर जोडूनिया ॥**
**दर्शन दे रे—गुरुराया ॥ ३ ॥**

याप्रमाणे विनंती चालली असतानाच एवढ्या मोठया रहदारीचे गर्दीत त्या फकीराने कीर्तनकारांचे डोक्यावर हात ठेवून "**अल्ला मालीक**" असे म्हटले व त्या गर्दीत कुठे शिरला ते त्या कीर्तनकारास समजले नाही. भक्त परिवार कीर्तनकारास म्हणाले:––आपण भाग्यवंत अहात ! आपणास बाबांनी दर्शन दिले. त्यावर कीर्तनकार म्हणाले:—अहो ! "**हे पवित्र पाय**" केव्हा हाती येतील तेव्हा खरे ! आपले कतव्य "**त्यांचे गुणगान**" त्यांची सेवा" हेच होय. या संसारात अनेक विवंचना डोळयासमोर उभ्या आहेत. त्या पार पाडता पाडता हे वय झाले. तरी बाबा प्रत्यक्ष येऊन भेटले नाहीत. कीर्तनकार पुढे म्हणाले :— मला चांगले आठवते की हे फकीर (साईबाबा) मोठे **अवलीया** आहेत. सर्वांसाठीच आहेत ते ! मला एकट्यालाच कां भेटावे ? या जगात आम्ही आमचे कार्य करण्यासाठी व तेही दररोजचे ! कोणास कोणी किती वशीला लावायाचा कीं जेणे करून **हे जीवन** सुखरूप होऊ शकेल. उदाहरणच सांगावयाचे झाले तर या संसारात आम्हास "मुले – मुली" असतात. त्यांना मोठे —करणे, उत्तम-शिक्षण देणे, त्यांना योग्य मार्गावर नेऊन ठेवणे, त्यांचे पुढील भविष्याची घडी योग्य प्रकारे बसविण्यासाठी कित्येक लोकांना कित्येकांचा केवढा वशीला लावावा लागतो की जेणे करून त्यांचे (मुला–मुलींचे) आयुष्य सुखकर होईल. अहो भक्त जनहो ! आज "**काळ**" केवढा बदलत चालला आहे. कोणास कोणी वशीला लावावा ! वा लावावयाचाच झाला तर तो किती ! दररोजचे बदलते काळात आम्ही "**सर्वसाधारण**" लोक दररोजचे व्यवहारात सुद्धा किती किती लोकांना **वशीला** लावता लावता नाके नव येते ? अशा परिस्थितीत "**श्री सदगुरू**

साईबाबांना " गाठण्यासाठी वशीला कोणाचा लावावा की जेणे करून हे " पवित्र पाय हाती येतील :– कीर्तनकार पुढे म्हणतात :–

वशीला कोणाचा लावू ॥
गुरूला – कोणाचा लावू ॥
हृदय मंदीरी पाय ठरावा ॥
वशीला – कोणाचा लावू ॥ धृ० ॥
पावन तुझे नाम दयाळा ॥
स्मरण्या निश्चय बहू केला ॥
परि केवी पडे भूल मनाला ॥
कोणाला पाहूं–– वशीला ॥ १ ॥
गुरु सहवास गोड जनाला ॥
जाळी अवघ्या या पापाला ॥
संचीत येते आडवी मजला ॥
कोणाला सांगू ॥ वशीला ॥ २ ॥
विधीने यत सहवास घडवीला ॥
बोधी निरंतर ती मजला ॥
परि बद्ध कसा हा बनला हेला ॥
कोणाला बोलू ॥ वशीला ॥ ३ ॥
दुरीत हराया––गुरु पाहिला ॥
तोची वळवी मन्मतीला ॥
आतां कैचा संशय उरला ॥
साईला विनवू ॥ वशीला ॥ ४ ॥

कीर्तनाचा तिसरा दिवस उजाडला. श्री सदगुरु साईबाबांचे " नवविधा " भक्तीचे " नऊ दिवस " " नवरात्र पूजन " कीर्तन रूपाने सांगण्याचे कीर्तनकारांनी जाहीर केले होते. त्याप्रमाणें कीर्तनाचे तिसरे दिवशी ही जनसमूदाय ( श्रोतृवर्ग ) फार मोठ्या संख्येने हजर होता. व आज बाबांचे कोणते रूप कीर्तनास दिसते त्याकडे एकसारखे लक्ष लागले होते. कीर्तनकारांनी बाबांचे परमभक्त श्रीयुत माधवराव देशपांडे उर्फ " शाम्या " यांस, बाबांनी कसे दर्शन दिले व त्याची भक्ती अटळ कशी करविली ते सुश्राव्य भाषेत वर्णन केले.

श्रीयुत माधवराव देशपांडे हे शिरडीत " शाम्या " या टोपण नावाने प्रसिद्ध होते. बाबांचे लाडके शिष्य व गळ्यातला ताईत अशी त्यांची ख्याती होती. कोणी कसाही शिरडीत आला की त्याची भेट बाबांकडे कशाप्रकारे करावी की जेणेकरून

त्याचे काम होईल ही श्याम्यास मोठी चिंता ! तसे पहावयास गेले तर शाम्या हे मराठी शाळेत रुपये १५ मासीक पगारावर शाळा मास्तर ( शिक्षक ) होते. परंतु बाबांचे अति आवडते भक्त होते की जेणे करून येणारे जाणारे सर्व भक्त मंडळीत आवडते झाले. शाम्या बाबांना नेहमी त्यांचे सानिध्यात–सहवासात राहात असल्याने त्यांचे मत त्यांना एकसारखे विचारीत कीं – ज्या बाबांची तू इतकी मनोभावे पूजा आरती भक्ती करतो की जेणेकरून हे पवित्र पाय ( बाबांचे ) हातातून सुटू नयेत व त्यासाठीच शाम्या बाबांना विनंती करीत असत :–

तूं माझा होशील कां ॥
साई – तूं माझा होशील कां ॥
शुद्ध अंतरी भार तुझा असे ॥
स्वीकार करशील कां ॥
साई तू माझा होशील का ॥ धृ० ॥
जग मायेच्या पडद्यातूनी ॥
बाहेर निघाले असे वाटे मनी ॥
पती-पत्नीच्या सहवासाने ॥
सेवा घेशील कां ॥ साई तू ॥
दुःखी जीवांकडे ध्यान देऊनी ॥
सेवा करावी असें वाटे मनी ॥
प्रयत्नांच्या आडवाटांना ॥
प्रसन्न होशील कां ॥ साई तू ॥
आत्मसुखाच्या मेरुकडे ॥
धांव घेत असें यापुढे ॥
दास कालीच्या विनंतीला ॥
सफल होशील कां ॥ साई तू ॥

याप्रमाणे शाम्याने बाबांचे पाय घट्ट धरून त्यांच्याकडून अभय वचन घेतले. बाबांनीही शाम्यास त्याप्रमाणे अभिवचन दिले— परंतु पुढे एके प्रसंगी:—काका दिक्षितांचे मनाचे शांतवन करण्यासाठी बाबांनी त्यांचेकडून (काकाकडून) भागवत सप्ताह करून घेतला व त्यांना त्याचे फळ दिले. हे पाहून शाम्यास मोठे आश्चर्य वाटले व बाबांचा रागही ( प्रेमरुपी ) आला. शाम्या बाबांना म्हणाले–हे देवा ! हा काय तुझा उलटा खेळ ! जो तुझी तन–मन–धने करून एकाग्र चित्तानें सेवा करतो त्याला जन्मभरात काही फळ दिले नाही व हे काका— नुकतेच तुमचे सानिध्यात आले त्यांना फक्त दोनच सप्ताहात मनाप्रमाणे फळ देतोच ! हे बरे आहे का देवा !

कीर्तनकार पुढे सांगतात की—बाबांनी शाम्याची अशी काय समजूत

घातली कीं **जादूची कांडी** फिरावी त्याप्रमाणे शाम्याने **बाबांचे पाय** धरले व आता हे पाय कधीच सोडणार नाही अशी शपथ वाहिली.

एके प्रसंगी श्रीयुत नानासाहेब चांदोरकर व काकासाहेब दिक्षित हे **दोघेही** लग्न-मुंज कार्यानिमित्त **ग्वाल्हेर** येथे जाण्याचे ठरल्यामुळे त्या **उभयतांनी** "**बाबांना**" ग्वाल्हेर येथे येण्याचे **आमंत्रण** केले. श्री बाबांनी आमंत्रण स्वीकारले व शाम्यास बरोबर न्यावे अशी **सूचना** केली. उभय भक्तांनी "बाबांची सूचना" मान्य केली व शाम्या उर्फ माधवराव देशपांडे यांना बरोबर **येण्याची गळ** घातली. शाम्याने बाबांचे पाय घट्ट धरून "चरणावर" मस्तक ठेवून रडू लागले व म्हणाले बाबा! बाबा! आपणास सोडून मी **कधीही कोठे** एकटा गेलो नाही तेव्हा हा **प्रसंग** म्हणजे **माझेवर** मोठा **आघातच** होय. आपले भेटी शिवाय मी कसा राहू शकेन? यावर बाबा म्हणाले शाम्या! शाम्या! तू का चिंता करतोस. या "**मशीदीचा फकीर**" मोठा दयाळू आहे. तू पुढे जा, लग्नकार्य आटोप व पुढे **तीर्थाटनही** करून ये! **तू पुढे चल. मी तुला येथे भेटेनच.** या प्रमाणे बाबांचे ब्रीद वाक्य ऐकून शाम्याने श्रीयुत चांदोरकर व दिक्षितां बरोबर ग्वाल्हेर येथे जाण्याचे **नक्की** केले. सोबत "**तात्या कोते पाटील**" यालाही तीर्थाटन करण्यासाठी बरोबर घेतले व ही **जोडी** ग्वाल्हेर **येथील मंगल कार्ये** आटोपून श्रीयुत चांदोरकर व दिक्षितांनी **आर्थिक सहाय्य** दिल्याने पुढे काशी, गया, प्रयाग, मथुरा–आदि तीर्थाटने करण्यास निघाले. वाटेत **गयेला** जाताना त्यांना कोणी सांगितले की, **गयेला प्लेग** आहे तेव्हा **तुम्ही** जाऊ नये. गयेची यात्रा **राहून जाईल** या चिंतेत **असतानाच** त्यांना एक **गयावळ** भेटला व म्हणाला तुम्ही का चिंता करता? मी गयेतच रहातो **तुम्ही** मज बरोबर माझे घरी **चलावे.** प्लेग वगैरे काही नाही. तुमच्या केसाला धक्का लागणार नाही याची हमी तुम्हास देतो.

कीर्तनकार पुढे सांगतात.

शाम्याने त्या गयावळावर "पूर्ण विश्वास" ठेवून त्यांच्याबरोबर जाण्याचे ठरविले. परंतु मोठ्या प्रवासात एकदाही कोठेही बाबा आले नाहीत त्यामुळे त्यांचे डोळे बाबांकडे लागले व अश्रू आले. हे दृश्य पाहून गयावळ शाम्याला म्हणाला, झाले! तुम्ही काही एक काळजी करू नका. तुम्हास सर्व प्रकारचे सुख लाभेल याची संपूर्ण काळजी घेण्याचे मी तुम्हाला वचन देत आहे. याप्रमाणे शाम्या, तात्या कोते पाटीलसह त्या गयावळाचे घरी गेले. त्यांचा गयेतील राहण्याचा भव्य वाडा. दारात हत्ती डोलत आहेत–नौकर–चाकर कामात गुंतले आहेत वगैरे दृश्ये पाहून शाम्याचे मन भरून आले त्या गयावळाने शाम्यास वरील मजल्यावरील खोलीकडे नेले व दाराची कडी उघडून त्यांना (शाम्याला) आत जाण्यास सांगितले! तो काय चमत्कार! दारा–समोरच भिंतीवर ॥ श्री साईबाबांची तसबीर ॥ पाहून शाम्याचे हृदय भरून आले व ते एकसारखे रडू लागले. हे विचित्र दृश्य पाहून गयावळ मोठ्या विचारात

पडला व तो शाम्यास म्हणाला; अजूनही आपले मनातून प्लेगाविषयी भीती जात नाही. अहो! ही गया-" पवित्र गया " आहे. याठिकाणी तुम्हास केसालाही धक्का लागणार नाही. त्यावर शाम्या म्हणाले-नाही हो! नाही-त्यासाठी रडत नाही मी. माझे देवासाठी डोळ्यात आनंदाश्रू आले आहेत. श्रीसाईबाबांचे तसबिरीकडे बोट दाखवून गयावळास शाम्या पुढे म्हणाले-या देवाचा खेळच काही और आहे. यांचे सानिध्यात माझे सर्व आयुष्य गेले व आता थोडे दिवस दूर जाण्याचा प्रसंग आला. तेव्हा माझी समजुत घातली की-तू पुढे जा, मी पुढे येत आहे.

श्रीसाईबाबांचे याप्रमाणे वर्णन ऐकल्यावर त्या गयावळाचे हृदय भरुन आले व त्यांना ही तसबीर बाबांचे आवडते शिष्य शाम्या यानेच मला दिली आहे असे स्पष्ट सांगितल्यावरुन बारा पंधरा वर्षांपूर्वीचा काळ दोघांचेही दृष्टीसमोर उभा राहिला. तसवीर देणारे गृहस्थच म्हणजे आपले आजचे पाहुणे असे गयावळास पटल्यावर, गयावळाने त्याची " मानमुरतब " कशी ठेविली ते कीर्तनकार सांगताना त्यांच्याही डोळ्यात आनंदाश्रू आले व " श्रीसाई भेट " कशी झाली हे ऐकून श्रोतृसमाजही फार आनंदी दिसला.

याप्रमाणे कीर्तनरुपी " नवविधा" भक्तीचे " नवरात्र " पूजनाचा "नववा" दिवस उजाडला व कीर्तनकार अतिशय आनंदात दिसल्याने श्रोतृवर्गही तेवढ्याच उत्सुकतेने कीर्तन शेवटचे दिवसाचे " समाप्ती पूजन कीर्तन—आज साईभेट—साई प्रसाद—साई कृपा होणारच याविषयी कोणासही कोणत्याही प्रकारची शंका उरली नव्हती. कीर्तनकाराने आठ दिवसाचा कीर्तनाचा आढावा घेऊन आज समाप्ती पूजन—श्रीसाईबाबांचे भेटी विषयींचे रम्य प्रसंग सांगून कीर्तनकार बाबांना विनवू लागले :—

साईनाथ तुझे हे नाम ॥
जीवाला देशी आराम ॥
जे येती तुझीये द्वारा ॥
त्यांना देशी सुखाचा थारा ॥
अंती भेटविशी घनश्याम ॥ साईनाथ ॥
अवघी पंढरी विठूरायाची ॥
समाधि लागली हरी नामाची ॥
केव्हां दाखविशी निजधाम ॥ साईनाथ ॥
हरती पापे भजता नामा ॥
तुझीया चरणीं कृष्णा भीमा ॥
पाजी भक्तांना मधुपान ॥ साईनाथ ॥
दास कालीस लाविली गोडी ॥

होई भग पूरीचा नावाडी ॥
पायी ठेवूनीया निष्काम ॥ साईनाथ ॥

यांप्रमाणे समाप्ती करताना कीर्तनकाराचे हृदय भरून आले व " **नव-विधा** भक्ती " कशा प्रकारे करावी की जेणे करून श्री साईबाबांचे हे " पवित्र **पाय** " हाती लागतील त्याचे गोड वर्णन करून—बाबांना हाका मारण्यास कीर्तनकाराने सुरवात केली. काव्यरूपी बोलावणे व बाबांची झालेली भेट त्याप्रमाणे **भरत-भेट** श्रीकृष्णार्जुन भेट श्री **विधी** हरीहर व सती अनसूया यांची भेट कशा प्रकारे झाली त्याचे वर्णन करून पुढील काव्य कीर्तनकार म्हणू लागले—

बाबाजी तेरा मेला बिछडा न जाये ॥
साईजी तेरा मेला बिछडा न जाये ॥ ध्रु० ॥
उची मेडी मेरे बाबाकी ॥
मुझसे चढा उतरा न जाये ॥
तो कहीयो-मेरे बाबासे ॥
मेरी बहीया पकड ले जाये ॥ बाबाजी ॥
अमीरोके आंका—फकीरोंके मौला ॥
गरीबोके गमखां—ओ-शिरडीवाले ॥
ओ-शिरडीवाले—ओ-शिरडीवाले ॥
तेरा मेला बिछडा न जाये ॥ बाबाजी ॥
गरीबोकी क्युं—सूनते नही ॥
उन्होके अरज़ू से क्युं झुकते नही ॥
तो क्युं नाम राख लिया ॥
रहम दिलबाबा-रहम दिलबाबा ॥ बाबाकी ॥
आयाहूं तेरे दरपे-खाली हात नही जाऊँगा ॥
वरना यही रों रों के-मेरे बाबाको सुनाउंगा ॥
सुनाउंगा सुनाउंगा-के मेला बिछडा न जाये ॥
साईजी तेरा मेला बिछडा न जाये ॥ बाबा ॥

वरप्रमाणे एकंदर करुण स्वरात बाबांना एकसारखी हाक मारीत असल्याचे कीर्तन ऐकून श्रोतवर्गही अतिशय गहिवरला व तोही कीर्तनकाराचे सुरात सूर मिळवून बाबाना विनंती करू लागला.

नवविधा भक्तीचे नऊ दिवसांचे नवरात्र पुजनाची या प्रमाणे समाप्ती होता होताच तो फकीर सभा मंडपात हजरच. फकीरास पाहून सर्वांना अत्यानंद झाला; व बाबांनीच या फकीराचे रुपात दर्शन दिलेले पाहून सर्वांचे हृदय भरून आले. कीर्तनकार पुढे म्हणतात.

(फकीरांकडे पाहून ) :-

दुआ चाहता हूँ बाबा ! दुआ चाहता हूँ ॥
तेरे प्यारका आसरा चाहता हूँ ॥ धृ ॥
तेरी महोबतनें पागल बनाया ॥
तेरे प्यारने यह रास्ता दिखाया ॥
वोही रास्तेसे चला जा रहा हूं ॥ दुआ ॥
शिरडी क्षेत्रमें स्थान बनाया ॥
भक्त जनोंको अपना बनाया ॥
प्यारका रास्ता उनको दिखाया ॥
वोही प्यारका आसरा चाहता हूं ॥ दुआ ॥

त्या **दयाळू फकीराने** कीर्तनकारा जवळ जाऊन सर्व श्रोतृवर्गास उद्देशून एकच वाक्य सांगितले. :- **" मजकडे पहा मी तुजकडे पाहीन "** व फकीर तेथून निघून गेले. हा विशेष प्रकारचा **" चमत्कार "** पाहून सर्व श्रोतृवर्ग एका आवाजात श्री साईभेटीबद्दल बोलू लागला :

साईनाथ आला—आला—मला भेटण्याला ॥
मला भेटण्याला आला—मला भेटण्याला ॥ धृ ॥
धन्य धन्य शिरडीनाथा ॥
धन्य तुझी गाथा ॥
पाहोनीया धन्य झालो ॥
तूज साईनाथा ॥
नाही मनी आठविला चुकोनिया एका वेळा ॥
तरी झाले दर्शन मजला—जोडीतो कराला ॥ साईनाथा ॥
योगीराज—राजाधिराज ॥
सद्गुरु—सच्चिदानंद ॥
अनंत कोटी—ब्रम्हांडनायक ॥
साईनाथ—महाराज ॥
माया तुझी—अपरंपार ॥
झाला वेडा पार ॥ साईनाथ ॥

* *

# इन्नल्लाहा अल्ला कुल्ले शॊइन खदीर

— डॉ. अनिल, नागपूर

अंदाजे ८ – ९ वर्षाअगोदरची गोष्ट. तेव्हा जर कोणी मला म्हटले असते की हा अमुक एका देवाचा फोटो किंवा मूर्ती आहे, तर मी त्याला मुर्खातच गणले असते. अहो देव तर निर्विकार, निर्गुण व सर्वव्यापी आहे. मग तो या मंदिर-मशीदीत कसा कोंबून ठेवता येतो? अशी माझी त्याकाळी भावना. एखाद्या संताच्या दर्शनाचा प्रसंग आला तरी तो मी टाळत असे. नास्तिकता ही माझ्या नखशिखात भरलेली. संत म्हटले तर त्यालाही दोन हात, दोन पाय. एक नाक. मग लोकांनी त्याच्या मागे का पळावे? हे सगळे सोंग मला आवडत नसे. याला मुख्य कारण असे की मी त्याकाळी वैद्यकीय शास्त्राचे शिक्षण घेणारा विद्यार्थी. 'जीवन क्षणभंगुर आहे. खावे, प्यावे, आणि मौज करावी. आला तो जाणारच. जन्मला तो मरणारच.' मग संत असो अथवा देवघराच दगड असो. त्याच्या दर्शनाची जरुरतच काय? अशी त्यावेळची माझी विचारसरणी.



लेखक : डॉ. अनिल जायस्वाल

परंतु म्हणतात ना, "मेरे मन कुछ और है, विधाता के कुछ और." फायनल एम्. बी. बी. एस. च्या परीक्षेला जेमतेम तीन महिने असतील नसतील तोच मला उजव्या शरीराचा अर्धांग वायु (लखवा, Hemipligia) झाला. तीन दिवस सतत प्राणवायुच्या नळ्या नाकपुड्यात कोंबून ठेवण्यात आल्या. शुद्धीवर आल्यावर आपली दयनीय अवस्था पाहून डोळ्यात अश्रू आले. जीवन नकोसे झाले. वडील अगोदरच वारलेले. सर्वात मोठा मुलगा मी. आई आणि आम्ही सर्व सात भावंडे चुलत्याच्या आश्रयात जीवन कंठणारे, आणि अशात अगदी दोन पाऊल शिखर असावं आणि खाईत पडावं किंवा तोंडापाशी आलेला घास निसटून जावा, किती दुर्दैव? शिवाय आश्चर्य असे की शरीराचा अपंगपणा वरूनच नसून माझ्या प्रत्येक अवयवात रोग जडला गेलेला होता व कारणीभूत कारण (Oetio-

logical Factor) वैद्यकीय विशेषज्ञान न उमगल्यामुळे मला तीन हप्ते नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये ठेवून सुट्टी देण्यात आली. कारणच न समजल्यामुळे उपचारार्थ औषध देताच येईना व माझा रोग 'नाईलाज' घोषित करण्यात आला. आणखी प्रयत्न करावा म्हणून मुंबईला हृदयतज्ञाकडे न्यावे असा सल्ला देण्यात आला. तिथे सांगण्यात आले की मी सहामहिन्यांपेक्षा जास्त काळ टिकू शकणार नाही.

वाचकहो, आश्चर्य असे की आज त्या गोष्टीला आठ वर्षे झालीत. मी धडधाकटपणें जिवंत असून ह्या ओळी पूर्वी–अपंग झालेल्या हाताने लिहून आपणासमोर ठेवायला समर्थ आहे आणि तो हृदयविशेषज्ञ ज्याने माझ्या विषयी भविष्य वर्तविले होते तो त्या दिवसापासून बरोबर सहाव्या वर्षीच हृदयविकाराने निधन पावला. हृदयविकार जडला होता मला आणि गेला तो. आहे की नाही चमत्कार. मी पूर्णपणे दुरुस्त व्हावयाला श्री साईबाबाच "डॉक्टरांचे डॉक्टर" होऊन आले असे माझेतरी ठाम मत झाले आहे.

जेव्हा माणूस सर्वमार्गांने त्रस्त होऊन निरूपायी होतो, तेव्हाच श्री साईमाऊली त्याला कडेवर उचलते. फक्त तिला गरज आहे दोन वस्तूंची (१) दृढनिष्ठा आणि (२) सबुरी. आणखी तिला काही एक तुमचे नको.

इ. सन १९६६–६७ मध्ये माझे चुलते काही कामानिमित्त औरंगाबादला गेले होते. योगायोग म्हणा किंवा माझे सुदैव म्हणा, त्यांचे शिरडीत समाधी मंदिरात जाणे झाले व त्यांनी तिथे नवस केला की पुतण्या जर डॉक्टर झाला तर त्याला शिरडीस श्रींच्या दर्शनाला पाठवू. नागपूरला घरी येताना त्यांनी बाबांची एक तसवीरसुद्धा आणली. मनात भाव नसताना सुद्धा मी फोटोला नमस्कार केला. उजवा हात अपंग असल्याकारणाने नमस्कारासाठी हात जुळण्यासाठी माझ्या मातोश्रीने तो उचलून धरला. वाचा बंद असल्याकारणाने मी मनातच चुलत्यांनी म्हटलेल्या शब्दांनी बाबांना आळविले. एक महिन्यातच मला परीक्षेस बसण्याची परवानगी मिळाली व पेपर्स लिहिण्याकरिता एका वकिलाची नेमणूक कॉलेजतर्फे करण्यात आली. मध्यंतरी रोज सकाळ संध्याकाळ शिरडीचा अंगारा खाल्याने मला बोलता येऊ लागले. मला वेगळ्या खोलीत पेपर्स सोडविण्याची तजविज त्यावेळचे डीन डॉ. पवार साहेबांनी केली. मी प्रश्नांची उत्तरे तोंडाने पुटपुटत होतो व नेमलेला वकील लिहीत होता. झाले आटोपली एकदाची परीक्षा संपली तरी मनात धास्तीच होती की आपण उत्तीर्ण कसे होणार? कारण वकिलाला वैद्यकीय आंग्ल-भाषा अवगत नसल्याकारणाने काही वाक्यांचे स्पेलिंग मराठीतच लिहिण्याची सुट देणे मला भाग होते व ते तरी त्याने बरोबर लिहिले होते की नाही, देव जाणे. इथेच मला देव आठवला. परंतु मी उत्तीर्ण झालो हे ऐकूनच मला आश्चर्याचा धक्का बसला. नागपूरचे पेपर्स बहुधा तपासणी-

करिता औरंगाबाद, पुणे, मुंबई इत्यादी विद्यापिठात जातात. त्यांना कसे माहित की मी अपंग आहे. त्यांना आंग्लभाषेत्रे स्पेलिंग मराठीतच लिहून परीक्षेचे पेपर्स सोडविणारी व्यक्ती गाढव वाटली नसेल काय ? परंतु श्रीबाबांनी त्यांची मती मारली व झोपेच्या गुंगीतच कदाचित् परीक्षकांना मला उत्तीर्ण करावे लागले असावे.

उत्तीर्ण होताच मला नवसाप्रमाणे शिरडीस येणे भाग होते. त्यावेळी माझा सांपत्तिक दर्जा शून्य होता. चुलत्यांनी काही पैसे दिले व मी आईसोबत शिरडीस जाण्याचे रिझर्व्हेशन करविले. त्याच दिवशी मला बाहेरगावी सरकारी नोकरीवर असणाऱ्या ज्येष्ठ चुलत्यांची १०० रुपयांची मनिऑर्डर मिळाली. मी परीक्षेत यशस्वी झालो म्हणून त्यांनी बक्षीस रूपाने हे पैसे पाठविले होते. माझ्या डोळयातून अश्रू वाहू लागले. गळा दाटून आला. बाबा किती दयाळू आहेत. आपल्याकडे येणाऱ्या भक्तांची ते किती चिकाटीने व्यवस्था करतात. खरोखरच ते रुपये माझ्या चुलत्यांनीच पाठविले होते काय ? नाही श्री बाबांनीच पाठविण्याची कोणत्या तरी रीतीने प्रेरणा दिली असावी. असो. आम्ही शिरडीस सुखरूपपणे पोहचलो.

श्री क्षेत्र शिरडीच्या परिसरात, वातावरणात व तेथील मातीच्या प्रत्येक कणात न जाणे कोणते चुंबकत्व आहे की मन पूर्णपणे प्रफुल्लीत होते. द्वारकामाईत श्रीबाबांनी अखंड प्रज्वलीत धुनीचे दर्शन केल्यावर मनातील सर्व षड्रिपूंचा एकंदरीत ऱ्हास होतो. समाधी मंदिरातील मूर्ती; मुख्यत्वेकरून मध्यान्ह आरतीच्या वेळी सजीव झाल्याचा भास सुदैवाने माझ्या या नेत्रांना लाभलेला आहे. लेंडीबाग, खंडोबाचे देऊळ, गुरुपादुका स्थान, चावडी, शिव, शनि, गणपती, बजरंगबली व विठ्ठलरखुमाईची देवस्थाने मन एका विशिष्ट प्रकाराने भारावून टाकतात. त्याचे समाधानकारक स्पष्टीकरण करण्याचे सामर्थ्य माझ्या लेखणीत नाही. तिथे समाधी मंदिरातील हॉलमध्ये आम्ही सात दिवस मुक्काम केला. गुरुवारी निघणाऱ्या 'पालखी-मिरवणुकीत' त्यावेळी मला जमत नसताना देखील काठीच्या सहाय्याने उभे राहून रोगग्रस्त खांदा मी पालखीला दिला . कुठला हा उत्साह ! कुठला हा जोम ! पूर्वजन्माच्या पुण्याईने कदाचित हा योग लाभला. नास्तिकता पार निघून गेली. चावडीतील स्वामी श्री शिवानेसाम यांनी मला द्वारकामाईतला पवित्र अंगारा व पणत्यातील तेल माझ्या रोगग्रस्त भागाच्या मर्दनासाठी दिले. नागपूरला आल्यावर मी मालीश केले व साई नामस्मरणात गुंग झालो. आश्चर्य, महान आश्चर्य ! एका आठवडयातच मला लिहिता व चालता-फिरता येऊ लागले. मी काही वैद्यकीय व्यवसायाला लागणारे किरकोळ साहित्य घेऊन श्री साईबाबांच्याच नावावर दवाखाना उघडला आणि पूर्वी अपंग झालेल्या हातानीच मी अंदाजे पाच हजार शस्त्रक्रिया पूर्ण केल्या. त्याबद्दल केंद्रीय आरोग्य मंत्र्यांनी नागपूर दौऱ्यावर असताना माझ्या उत्कृष्ट कामगिरीचा गौरव करून प्रशस्तीपत्र व पारितोषक बहाल केले. लंडनस्थित रॉयल सोसायटी ऑफ हेल्थ संस्थेने मला ऑनरेरी डिग्री देऊन सन्मान केला. खरंच म्हटलेले आहे

की " मुकं करोती वाचालं । पंगु लंघयते गिरीम् ॥ यत कृपात अहं वन्दे । परमानंद माधवम् । " माझा दृष्टिकोन बदलला, विचारशैली व राहणी बदलली. दरवर्षी हिवाळ्यात एकदा तरी मी शिरडीची वारी करीत असतो. दरखेपेस एकप्रकारे माझी ओव्हर ऑईलिंग होऊन मी दुप्पट उत्साहाने परत येतो. श्री बाबा मला बोलावतात शिरडीस येऊ देतात–हीच त्यांची मेहरबानी व हेच माझे भाग्य. त्यांची थोरवी वर्णन्याकरिता मनसारख्या विमूढ अज्ञानी माणसाजवळ काय शब्द असणार व माझी काय क्षमता ! तरीपण अनेक अनुभवापैकी खालील काही अनुभव महत्त्वाचे वाटतील.

१

माझा अपंग रोगग्रस्त उजवा हात बरा झाल्यावर मी श्री बाबांच्या चेहऱ्याचे स्वतःच्या हाताने एक चित्र बनविले व फ्रेम करून त्रिपुंड वगैरे लावून लटकिवला. त्याच रात्री श्री बाबा स्वप्नात आले व म्हणाले :– बच्चा । भूक लागी हाय । कुछ खानेकु मिलेगा ? " मी त्यांचे पाय गडवाभर पाण्याने धुतले. त्यांना पाटावर बसवून पत्रावळीवर जेवण वाढले. माझ्या पूर्णपणे लक्षात आहे की ती जागा म्हणजे द्वारकामाईचे पटांगण. बाबांनी जेवण केले व " अल्ला तेरा भला करेगा " म्हणत निघून गेले. ठरल्याप्रमाणे नोव्हेंबर १९७३ साली शिरडीला गेलो असताना गुरुवारी मातोश्रीने तयार करून दिलेली ताटे घेऊन आम्ही मशिदीत गेलो. तेथील धुनीत भोजनसामग्री व श्रीफळाची आहुती दिली. अग्निदेवतेला साष्टांग नमस्कार करण्याकरिता आम्ही वाकलो असताना एका जोरदार विस्फोटाद्वारे मी टाकलेले श्रीफळ वर फेकले गेले, व परत धुनीत पडले. धुनीची विभूती माझ्या व मातोश्रींच्या अंगावर पडली. समाधी मंदिरातील मुख्य पुजारी श्री दिगम्बर जाखडी व गुरूपादुका स्थानातील श्री पाठक महाराजांना याबाबतीत विचारले असता ' श्री बाबा खुप झालेत ' असे स्पष्टिकरण करण्यात आले.



लेखकाने चितारलेले श्रीबाबांचे छायाचित्र.



धुनीमाता

२

म्हणवूनि शाखा–चंद्रन्याय । अंगुष्टी तर्जनी–मध्यमा उभय ।
ठेवूनी दावी साईमाय । सोपा उपाय निजभक्तां ॥
म्हणे होऊनी निरभिमान । सर्वांभूती खालवा मान ।
करा एक अंगुष्ठ ध्यान । सोपें साधन भक्तीचे ॥




लेखकाने चितारलेले श्री बाबांचे चरणकमल

करिता मी स्वतःच्या हस्तकौशल्याने बाबांचे उजवे चरण आकृतीबद्ध केले व सतत त्याचे ध्यान हृदयस्थानी स्मरून नामस्मरण करीत आहे. एप्रिल १९७४ ला स्वप्नदृष्टांतात श्री बाबा मला म्हणाले, " ॐ शिवाय साई राम देवाय नमः, या तेरा अक्षरी नामाचे दररोज १८ वेळी तू स्मरण करीत जा. तुझे कल्याण होईल." अद्यापही मी तसे करीत आहो.

३

माझ्या धाकट्या बंधू दिलीपला बाबांनी स्वप्नात दृष्टांत दिलाः—आमच्या देवघरातील श्री बाबांची मूर्ती संजीव होऊन आशिर्वादास्तव हात उठवीत मंद स्मित करीत आहे. श्री बाबा म्हणालेः—" तू माझी पूजा कर. अल्ला मालीक है।" तेव्हापासून तो नियमित पूजा करितो.



लेखकाच्या निवासस्थानी असलेली श्रीबाबांची मूर्ती

४

ई. सन १९७१ साली दिवाळीच्या काहीच दिवस अगोदर गुरुवारच्या सायंकाळी आम्ही सर्व पूजा करीत असताना एक कोढ फुटलेली म्हातारी भिक्षेकरिता दारात उभी झाली. आमच्या आग्रहास्तव ती पूजा-आरती संपेपर्यंत देवघरा- जवळ बसली. श्री साई सगुणो—पासना मधील सर्व आरत्या त्या अशिक्षित भिक्षेकरू वृद्धेने मुखपाठ आमच्या सोबत म्हटल्या. पुजा आटोपल्यावर दिवाळीचे गोडधोड पदार्थ व जेवण तिच्यापुढे ताटात ठेवण्यात आले. तिने प्रयेकातील थोडा थोडा ग्रासच सेवन केले. अगोदरच तिने जास्तिचे सर्व पदार्थ वेगळया ताटात काढून दिले होते. ते आम्ही प्रसादरूपाने ग्रहण केले. तिचे म्हणणे होते की, " कोणत्याही स्थितीत जास्त खादाडपणा करणे हानिकारक असते." नंतर ती वृद्धा फक्त एकदा म्हणजे १९७२ च्या तुळशीविवाहाच्या दिवशी आली होती व प्रसाद घेऊन निघून गेली. अजूनही आम्ही तिची आतुरतेने वाट बघत आहो. पण ती कुठून आली होती व व कुठे गेली काही सांगता येत नाही. मी तिच्या पायाला झालेल्या जखमेला ड्रेसिंग करून दिले होते. विशेष हे की ते करताना मी न्याहाळून बघीतले होते की तिचा पूर्ण पोज शिळेवर बसलेल्या श्री बाबांचा होता व मुखमुद्रा चित्रकार स. कृ. काळेद्वारा रेखित आशिर्वाद फोटोशी तंतोतंत मिळत होती.

५

श्री बाबा दत्तस्वरूप असल्याकारणानें सर्व देव त्यांच्यातच आहे अशी श्रद्धा बाळगून मी ता. १२।१।७५ ला रूद्राक्षाची एक माळ बाबांच्या गळ्यात शोभेल म्हणून नेलेली होती. मार्गात मी श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लींगाला स्पर्श व पूजा करून शिरडीला पोहचलो. प्रवासात नामस्मरण करीत असताना सहजपणे वाऱ्यावरचे विचार मनात येऊन गेले की 'अशीच एक माळ बाबा मला पूजेसाठी देतील काय?' गोष्ट मनात आली व मी ती विसरूनही गेलो. काय वावळटपणा. साक्षात परमेश्वराला वाहण्याकरीता घेऊन चाललेल्या वस्तुची, नेणारा इसम तिला परत मिळण्याची अपेक्षा करीत असतो. किंती लोभी हे मन. वाचकहो विचार करा, शिरडीला पोहचणाऱ्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे ता. १३।१।७५ ला सुमारे ४ वाजता सायंकाळी पशुपतीनाथाच्या रूद्राक्षाची श्रीबाबाला वाहिलेली एक माळा घेऊन समाधीमंदीरचे



पुजारी–हार्मोनियम मास्टर श्री ललीत कुमार महाराज आमच्या खोलीवर येऊन थडकले व म्हणाले :—"मुझे प्रेरणा हुई की यह माला मैं आपके पास पहुंचा दूं। पिछले अनेक वर्षोसे यह मेरे पास है।" त्यांनी पुढे सांगितले की ही माळ त्यांना शिरडीत मंगल कार्यालयाची इमारत बांधणाऱ्या पारशानी श्री बाबाला घातल्यानंतर परत मिळाल्यावर दिली होती व आदल्या रात्री पासून त्यांचे मन ती मला देण्याकरीता बेचैन झालेले होते. मी नेलेल्या माळे विषयी त्यांना काही एक माहीती नव्हती. शिवाय मी नेलेली माळ क्षुल्लक स्वरूपाची होती. श्री बाबांनी ती स्वीकारण्याअगोदरच ही अनमोल पवित्र माळ मनातील विचार ओळखूनच माझ्या ईच्छापूर्तीसाठीच पाठविली होती. त्यांना दाखवायचे होते माझ्या ह्या नाशवंत देहात सुद्धा त्यांचे वास्तव्य आहे. मनातील विचारचक्र ओळखण्याची त्यांच्यात अफाट अमर्यादित शक्ती आहे. अर्थातच अंतकरण शुद्ध ठेवण्याचा व मनात कुविचार, विकल्पाला स्थान न देण्याचा माझा आटोकाट प्रयत्न सुरू असतो. प्रत्येक प्राणीमात्राच्या अंतः-

करणात त्यांचे वास्तव्य असते. ही गोष्ट निर्विवाद आहे. मकर संक्रातीला अर्पित केलेली माळ परत मिळाल्यावर ती श्री ललीत महाराजाला दिली हे सांगणे नकोच.

६

ता. १६–१+७५ ला सकाळी भक्तनिवासातील आमच्या खोली समोरून वयोवृद्ध श्री अप्पा चोपदार जात होते. सर्व देवळांचे त्यांचे दर्शन आटोपले होते. मला पाहताच ते खोलीवर आले. नमस्कार वगैरे झाल्यानंतर मी सहजपणे विचारले, " कुठे निघालात अप्पा ! " ते म्हणाले, " मागील तीन हप्त्यापासून अगदी बेजार झालो या खोकल्याने. आरतीच्या शेवटी ललकारी लावताना फार कष्ट होतो. येथील इस्पितळात औषधपाणी केले. पण गुण कुछ आता नहीं. अब हम इलाज के वास्ते कोपरगाव जाता." प्रवासात काही गोळ्या कॅप्सुल्स बाळगण्याची मला जडलेली नेहमीची सवय. मी श्री बाबांचे नाव घेऊन काही गोळ्या त्यांना दिल्या. त्याच रात्री त्यांना बारा आणे आराम पडला. दुसऱ्या दिवशी ते आले व अशिर्वाद देऊन म्हणाले, " ये बाबाका कुछ समझ में नहीं आता। मैं निकला था कोपरगाव और इलाज यहीं भक्त निवासपर करवा दिया। उनकी लीलां बडी विचित्र है। " खरंच बाबांची लीला फार विचित्र आहे. अहो ते तर फक्त अंगाऱ्यानेच मोठ मोठे रोग, आपत्ती व बाधा सुधरवू शकलेत व अद्यापही करतात. आपण पामरांना त्यांच्या लीलेची विशेषता कशी काय कळणार. 'श्री साईलीला' मासिकात आपण फक्त त्यांची लीलाच वाचतों किंवा लिहितो. त्यांच्यातील गूढ मात्र उकलता येत नाही. ते कोडे शेवटी रहस्यमयच राहते. श्री साईलीलेचा सागर अफाट व मर्यादीत आहे. आपल्या संतोषाकरीता आपण फक्त त्यांत डुबकी लावून बाहेर निघत असतो. ज्याप्रमाणे शरीराला स्वच्छ ठेवण्यासाठी आंघोळ आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अंतःकरणाची मलीनता दूर सारण्याकरी 'श्री साईलीला मासिकाचे वाचन आवश्यक आहे. म्हणुनच म्हटलेले आहे की,

" मोरे बाबाकु मर्मन जानारे कोई "

मी आणखी दोन दिवसाचे औषध श्री अप्पा भालेराव चोपदाराना दिले व त्यांच्या पायावरच मस्तक ठेवून म्हटले, " असंच गुण सर्व रोग्यांना येऊ द्या बाबा. या क्षणभंगुर जीवनाचे सार्थक तरी होईल. नहीं तों नंगाही पैदा हुवा था और नंगाही जाना है. "

७

श्री बाबांनी हाक ऐकली आणि नुकतीच आलेली 'प्टेरीजियम' ( PTERYGIUM ) ची केस जी फक्त शल्य चिकित्साद्वारेच सुधरू शकते श्री साईकृपेने व साधारण औषध पाण्याने श्रीबाबांनी या ओळीच्या लेखकाकरवी सुधरविली.

८

शिरडीस लेंडीबागेजळ एक साधारण हॉटेल आहे तिथला मालक हाजी मलंगाला

फार मानतो. ता. १७-१-७५ ला दुपारी अडीच तीनच्या सुमारास शिरडीनिवासी ज्ञानेश्वर वैद्य या इसमा सोबत तिथे काही आणण्या करीता गेलो असताना माझी दृष्टी तिथे लाविलेल्या हाजी मलंगच्या फोटोवर पडली. तितक्यातच एक लंगोटी घातलेला वृद्ध संन्यासी तिथे आला आणि "हाजी ऽऽ मलंग ऽऽ" असे जोराने म्हणाला, त्या संन्यासाने फक्त हाफ चहा व २ पुऱ्या माझ्या कडून मागून घेतल्या. मी जास्त घेण्याचा जोर दिला तर त्याने माझ्यावरच शिवीगाळीची लाखोली वाहीली व म्हणाला, 'हमको क्या समजता है बे. ! तुम चहा हमको पिलाता हम तुमको पिलाता. ज्यादा खानेसे लिवर खराब होता. दिनभरमें हम इतनाही खाता. हमारी जेब कभी देखी हैं ! लाखों के वारे न्यारे होते है रोज. गुड इवनिंग ऽऽऽ गुड मारनिंग. जाओ अल्ला भला करेगा." असे म्हणता म्हणता तो थोडे दूर निघाल्यावर अचानकपणे जागच्या जागीच अदृष्य झाला. ज्ञानेश्वर वैद्य तिथेच उभा होता. तो मधे मधे समाधी मंदीरात गायन भजनाची हजेरी देत असतो. त्याच्या मते हा विलक्षण संन्यासी त्याने पूर्वी कधीही शिरडीत पाहिलेला नव्हता. त्याला या आश्चर्यकारक घटनेने शरीरात उत्साह व चैतन्य भरले गेले व तो आपली दुकानदारी सोडून रात्रीपर्यंत संपूर्ण शिरडी गावातल्या विलक्षण साधुचा तपास करण्याकरीता गमविली. परंतु त्याचा त्याला थांग पत्ताही लागला नाही. मी हॉटेलवाल्याला त्याच्या बिलाचे ३० पैसे (पाच आणे) देऊन मोकळा झालो. दुसऱ्या दिवशी सकाळीच श्री अप्पा भालेराव सुतार या वृद्ध चोपदाराने कळविले की श्री बाबा तुझ्याशी 'हाजी-मलंग' म्हणून चहा पिऊन निघून गेलेत. माझी मती गुंग झाली. मी अज्ञानी विमूढ, अल्पबुद्धी जीव. पूजा-अर्चा मला काही एक माहीत नाही. पण काय श्री बाबा व काय त्यांचे चमत्कार. मी किती तरी वेळ तसाच्या तसाच उभा राहिलो. नंतर द्वारकामाईतल्या छबीतही मला हाजी-मलंग म्हणणाऱ्या वृद्धाचे दर्शन झाले.

अधुनमधून श्री संत गुलाबबाबा नागपुरला असताना त्यांच्या निवासस्थानी मी दर्शनार्थ जात असतो. एकदा स्वप्न पडले कीं मी नाईकरोड वरील त्यांच्या निवास स्थानी जात असताना मार्गातच देवीचे देऊळ दिसले. मी दर्शन घेतले. देवी कमलांच्या फुलांनी सजलेली व हिरव्या बांगड्या हातात घालून होती. हुबेहुब कोराडीचे श्री महालक्ष्मीचे दैवत. मी बाजूच्या खोलीत डोकावले तर तिथे जात्याचे पाट व एक धान्य भरलेले पोते (द्वारकामाईचे दृश्य) दिसले. नंतर मी श्री गुलाबबाबांच्या निवासस्थानी गेलो तर द्वारकामाईत बसलेले साक्षात



संत श्री गुलाबबाबा

श्रीसाईबाबा त्यांच्या गादीवर विराजमान झालेले दिसले. मी हार घातला व आरती करून साष्टांग नमस्कार केला. पाठकगण योग्य तो निष्कर्ष काढण्यास मोकळे आहेत. एक गोष्ट विशेष म्हणजे श्री संत गुलाबबाबांच्या कृपेनेच मला मीठ खाणे मागील तीन वर्षापासून अजिबात वर्ज्य आहे. व माझा वाढलेला रक्तदाब (Blood-Pressure) २५० पासून १८० पर्यंत पोहचला.

पुढे थोडक्यात सांगणे म्हणजे शिरडीहून श्री साईबाबांच्या कृपेने व त्यांनीच निर्माण केलेल्या प्रेरणेने मी चाळीसगाव मुक्कामी श्री रामदेव बाबा मंदिराचे संत श्री बापजी महाराजाकडे मागील वर्षी गेलो होतो. त्यांनी मला सांगितलेली दैविक विधि व उपाय योजना वैद्यकीय दृष्ट्या हानिकारक असतानाही "कोणा एका संताच्या सांगितलेल्या वस्तूंच्या सेवनानेच मरण येत असेल तर त्यापेक्षा भाग्य मोठे कोणते!" या विचारधारणेने तंतोतंत पार पाडली.

आता माझे ब्लडप्रेशर जे श्री साईबाबांनी

(१) जीव वाचविल्यावर २५०

(२) श्री गुलाब बाबांद्वारे १८०

(३) ते पुढे श्री बापाजी महाराजांद्वारे १३०

पर्यंत म्हणजे जवळ जवळ नॉर्मल झालेले आहे. श्री संत बापजी महाराजांनी दीर्घायुष्याचा आशीर्वादही मला दिलेला आहे. दूर-दुरून येणारे भक्त मी त्यांच्याकडे बघितले. अनेक दुःखी येतात व सुखी अंतःकरणाने परत जातात. देणे घेणे काहीच नसते.

"विश्वासं फलदायकं"

संताच्या जीवनात ते प्रत्यक्ष वावरत असताना फार थोडेच लोक त्यांना समजतात व तेच संत समाधिस्त झाल्यावर त्यांच्याच समाधीवर पूर्वीचे अविश्वासू मोठ्या श्रद्धेने फूल-चादर चढवितात. कोणत्याही संतावर आपला विश्वास नसेल तर गप्प राहणे श्रेष्ठ. त्यांची निंदा करून पापाचे भागिदार बनू नका अशी वाचकांना माझी नम्र विनंती आहे.


अलीकडे मी रोग्यांची शुश्रूषा योग्यरितीने करून जी चटणी भाकर बाबा देतो त्यातच समाधान ठेवून फावल्या वेळात मनाला नामस्मरणात रंगवितो. प्रत्येक प्राणीमात्रात "बाबा" पाहण्याचा माझा प्रयत्न चालू असतो. शेवटी म्हणायचे हेच की सर्व संत एकच आहेत. सर्व देवं एकच आहेत. परंतु आपण मूर्ख आहोत की प्रत्येकाना वेगवेगळे मानतो. म्हणूनच कुराणात म्हटले आहे की– "इन्नलाहा अल्ला कुल्ले शैइन खदीर।"

• • •

# 'भक्त बिल्वमंगल'

डॉ. के. भ. गव्हाणकर

जग ही केवल मनुष्याच्या इंद्रियसुखाचा आस्वाद घेण्यासाठी असलेली फुल-



डॉ. के. भ. गव्हाणकर

बाग नव्हे. त्यात सुखें आहेत दुःखहि आहेत व त्याबरोबर सुख आणि दुःखाच्या दुर्धर प्रसंगातून उज्वल रहाणारी मानवी ध्येयनिष्ठाही आहे. या ध्येयनिष्ठेतच खरे समाधान आहे.

दक्षिण प्रदेशात कृष्णाविणा नदीचे काठी एका गावात रामदास नावाचा एक भगवद्भक्त ब्राह्मण राहात होता. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव बिल्वमंगल त्याच्या पित्याने धर्मशास्त्रांचे शिक्षण दिले होते. त्यामुळे त्याचा स्वभाव प्रेमळ, शांत, शिष्ट व श्रद्धावान झाला होता. परंतु त्याच्या आईवडिलांच्या पश्चात त्याला कुसङ्गती लागली व वडिलांनी कमविलेल्या संपत्तीची लूट त्याचे मित्र करू लागले.

यौवनं धनसम्पत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।<br>
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम ॥

तरूणपण धन, प्रभुत्व आणि अविवेक–यामधून एक एक मोठा अनर्थ घडतो. मग हे चारी एकत्र झाले तर काय होईल ?

वाईट संगतीच्या योगे–संगती संग दोषेण बिल्वमंगल नादान बनला व दिवसे दिवस बिघडत गेला. एके दिवशी गावामध्ये चिन्तामणी नामक वेश्या नाच करण्याकरिता आली. तिचा नाच बघण्यास शोकीन लोक जाऊ लागले बिल्वमंगलही आपल्या कुटिल मित्रासह गेला होता.

वेश्या सुंदर, देखणी व हावभाव करून नाचण्यात तरबेज होती. तिला पाहिल्याबरोबर बिल्वमंगलचे चंचल मन आंदोलन खाऊ लागले. व विवेकशून्य

बुद्धीने तन मन धनासह तिच्या रूपावर भाळून तिला शरण गेला व आपले, कुल, मान, मर्यादा या सर्वांवर पाणी सोडून तिच्या संपूर्ण आहारी गेला. उठता बसता खाता पिता सर्व काळ तिचाच ध्यास व चिंता.

तो दिवस वडीलांच्या श्राद्धतिथीचा होता; म्हणून त्याला नदीच्या पलीकडे वेश्या चिन्तामणीच्या घरी जाता येत नव्हते. श्राद्धाची तयारी झाली व ब्राह्मण त्याच्याकडून पिंडदान करून घेत होते. परंतु त्याचे लक्ष मात्र दुसरीकडे म्हणजे चिंतामणीच्या चिंतनात गुंतले होते; त्याला काहीच गोड लागत नव्हते.

एकदाचा श्राद्धविधी आटोपला ब्राह्मण भोजन आले. तोच त्याने चिंतामणीच्या घरी जाण्याची तयारी केली. जमलेल्या मंडळीने समजाविले की "बाबा! आज तुझ्या वडीलांचे श्राद्ध झाले आहे. त्यानिमित्त ब्राह्मण भोजन, व आप्त मंडळी तृप्त झाली आहेत. तरी निदान आजचा दिवस तू वेश्येच्या घरी जाऊ नकोस. पण ते त्याने न ऐकता तो चालू लागला व नदी किनारी आला. तोच अकस्मात मुसळधार पाऊस पडू लागला व नदीला तुफान पूर आला. मेघाच्छादित आकाश झाले व सर्व वातवरण भयानक विजेच्या कडकडाटाने निनादून गेले. नदी किनाऱ्याला रहाणाऱ्यांची पाचावर धारण बसली व आप-आपल्या होड्या वृक्षाला घट्ट बांधून ठेवून ते विचारमग्न स्थितीत बसून राहिले. बिल्वमंगलने त्यांची विनवणी केली. पैशाची लालूच दाखविली, परंतु अशा तुफानात मृत्यूबरोबर सामना करण्याचे कोण धारिष्ट करील? सगळ्यानी नकार दिला.

कामान्ध व जाण्यास अधीर झालेल्या बिल्वमंगलने त्या नदीच्या पूरात आपणास झोकून दिले. कर्मधर्मसंयोगाने एक प्रेत वहात येत होते. त्याला लाकडाचा ओंडका समजून त्याला मिठी मारली व त्याच्या सहाय्याने तो नदी पार करू शकला.

"कामातुराणां न भयं न लज्जा"

त्याला कशाचीच शुद्ध नव्हती, बिल्कूल दिगंबर झाला होता. सगळीकडे भयाण दिसत होते, पक्षांचे, पशूंचे भयानक आवाज येत होते, पण बिल्वमंगल आपल्याच नादात बेहोश असल्याने तो कशाचीच पर्वा न करता चिंतामणीच्या घराकडे जाऊ लागला.

वडीलांचे श्राद्ध असल्यामुळे बिल्वमंगल आज काही येणार नाही असे समजून चिंतामणी दाराना कड्या लावून निवांत झोपी गेली होती. बिल्वमंगलने पुष्कळ हाका मारल्या, पण त्या मुसळधार पावसाच्या व सोसाट्याच्या वाऱ्याच्या भयंकर गर्जनात तिला ऐकू गेल्या नाहींत. बऱ्याच वेळाने तो घराच्या मागल्या बाजूस आला. तोच त्याला एक दोरखंड लोंबत असलेला दिसला. त्याला धरून तो वर भिंत चढून गेला व तिच्या खोलीत आला. चिन्तामणी जागी झाली व पहाते तो नग्न भिजलेला व अंगाला दुर्गंधी येत आहे असा बिल्वमंगल पाहून तिला भय व आश्चर्य वाटले.

तिने तो कसा आला ते सर्व ऐकून घेतले व ज्या दोराला धरून तो वर आला तो बघण्याकरिता ते दोघे बाहेर आले, व दिव्याच्या प्रकाशात पाहिले तो काय! तो दोर नसून एक काळा नाग लोंबकळत होता, भीतीने दोघांची गाळण उडाली.

चिन्तामणीला आश्चर्य वाटले व दुःखही झाले, ती म्हणाली "तू जातीने ब्राह्मण आहेस. आणि आज तुझ्या वडिलांचे श्राद्ध झाले असून, तू एका हाडा-मांसाच्या पुतळीवर आसक्त झालास! आपल्या धर्मावर तिलांजली दिलीस व या भयानक रात्रीच्या भयंकर काळोखात नदीमध्ये वहात असलेल्या मुडद्याला धरून व शेवटी सापाला दोरी समजून येथे आलास! तुला बुद्धीभ्रम होऊन तू पागल झालास! ज्या सुंदरी करिता तू वेडा झालास तिचीसुद्धा अशीच त्या मुडद्याप्रमाणे स्थिती होणार आहे, धिक्कार असो तुझ्या नीच वृत्तिचा! अरे एवढे प्रेम जर तू मनमोहन श्यामसुंदर वर केले असतेस, आसक्त झाला असतास तर आज तुला देवाचे दर्शन झाले असते. इतकेच काय पण या ऐहिक जगात तुझी पालखीतून मिरवणूक काढली असती! तू कृतार्थ झाला असतास!

देह ही प्रेमाची केवळ लहरी आहे. ती अखंड चंचल असून अखंड स्थिर आहे. त्यात चैतन्य अखंड नित्यनवे असे चंचलत्वाने स्थिर आहे. ते स्थिरत्व देहाच्या आकार रूपाने भासते चंचल नाविन्यत्व भोगप्रतीतीने चैतन्यदर्शन देते.

देह ही प्रेमाची लहरी असल्याने तिला कालवाचक जीवन नाही स्फूर्ती वाचक तो अखंड उद्रेक सतत उमटत असतो, काल उद्रेकाची गणना करू पहाता, तिचा उद्रेक अखंड स्फूरद्रूप असून अखंड चैतन्य जीवनाशी मिळालेलाच आहे.

त्या वेश्येचे मर्मभेदक बोल बिल्वमंगच्या काळजाला भिडले. त्याच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला, प्रेमाचा समुद्र उफाळला आणि त्याच्या डोळ्यावाटे आनंदा-श्रुच्या अजस्त्र धारा वाहु लागल्या. बिल्वमंगल, चिन्तामणीचे पाय धरून म्हणाला "माते! तू आज मला दिव्य दृष्टी दिलीस व कृतार्थ केलेस." तिला गुरू मानून नमस्कार केला व त्याचक्षणी त्यांनी परमार्थाची वाट धरली.

खुल गयी ऑंखें अभिलाखै रुपमाधुरिको ।
चाखैं रस-रंग ओ उमंग अंग न्यारिये ॥ (भक्तमल)

भक्ती हा प्रभूचा-प्रेमरूपाचा-सहज प्रकाश आहे. म्हणजेच जीवाने मिळविण्या ची स्वकर्माने दाखविण्याची ती भक्ती नव्हे. प्रेमरूपाचा जो प्रकाश (जी प्रतीती) तिची भोगावस्था म्हणजे भक्ति होय. या दृष्टीने देवळात जाऊन कर्मदृष्टया १००० दंडवत घालणे नाक घासणे, इत्यादि कर्मात जीव दीनता दाखवील. तिला भक्ती हे नाव शोभणार नाही. पण प्रभूच प्रेमाची प्रतीती झाल्यावर (जीवाची जी अनन्य प्रीतीने स्थिती होते.) त्यात प्रभू! तुझ्याहून मी वेगळा नाही तूच माझे रक्षण करीत आहेस, अशी गोडी निर्माण होते व त्या गोडीत मग देवाला आळवणे भेटणे

घडते. त्याला भक्ती अनुभव भक्तीयोग हे नाव शोभेल. प्रभु होऊन म्हणजे प्रभूच जीवामध्ये व्यक्त होत आहे हे जाणून (अनुभवून) सर्व भावाने प्रेम न धरल्यामुळे जे गोड प्रीतीचे बोल अगर भेटीचे सोहळे होतात त्याला भक्ती हे नाव आहे.

वेणू-माधव श्यामसुंदरची मनमोहन, प्रेममय मूर्ती पाहून बिल्वमंगल सर्व ऐहिक सुख विसरला व त्या प्रेमळ मूर्तीच्या ध्यान मग्न स्थितीत ' कृष्ण कृष्ण ' म्हणत सगळीकडे भटकू लागला. काही दिवसानंतर त्याला अकस्मात एक सुंदर रुपवती स्त्री आढळली. पूर्वीचे संस्कार अद्याप घर करून राहिल्यामुळे, त्या युवतीचे सुंदर रुप पाहून चंचल मनाने परत उचल खाल्ली व तो त्या स्त्रीच्या मागे मागे जाऊ लागला. श्री भगवान श्री भ. गीतेत सांगतात—

यततोह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ती प्रसन्नं मनः ॥ २–६०

तो तिच्या घरापर्यंत गेला. ती घरात गेली व बिल्वमंगल उदास होऊन घराच्या दरवाजा बाहेर पायरीवर बसून राहिला. घराचा मालक बाहेर आला. पहातो तो एक ब्राह्मण पायरीवर बसला आहे. त्याला विचारता, त्याने कपट न ठेवता सर्व हकीगत सांगितली व म्हणाला मला एकदा त्या स्त्रीला पहावशी वाटते तरी एवढी माझी इच्छा पुरी करा. ती स्त्री त्या शेटची धर्मपत्नि होती. त्यानी पाहिले की याच्यामध्ये हानी काहीच नाही त्याला जर तिला नुसते पाहून तृप्ति मिळते तर ती त्याला का देऊ नये ! असा विचार करून सावकार आपल्या पत्निला बोलावण्यास आत गेला.

• एकदा ईश्वराला–श्यामसुंदराला अनन्य शरण गेल्यावर, योगक्षेमाची सर्व चिंता त्यालाच असते. सर्व प्रेमाचा जिव्हाळा, जीवीचा जिव्हाळा जागृत झाला, छाती फुटून रडू आले. कंठ दाटून आला. अज्ञानान्ध बिल्वमंगलला अंतरी ज्ञानाचा झरा लागला हृदय भरून आले, बाष्पगद झाला व त्या स्थितीत त्यानी बेलाचे दोन काटे तोडले, इतक्यात ती धर्मपत्नि तेथे आली. बिल्वमंगलने तिला पुन्हा एकदा पाहिली आणि स्वतःचा धीक्कार करत म्हणाला ' अभागी डोळ्यानो आज जर तुम्ही नसता तर माझे पतन झाले असते का ? एवढे बोलून दोन्ही डोळ्यात बेलाचे ते काटे भोसकले. त्यातून रुधीर वाहू लागले. नंतर त्याला फार आनंद झाला व तो आनंदाने बेहोश होऊन " गोविंद-गोविंद ' म्हणत नाचू लागला.

पूर्णत्वाची अवस्था जीवनमुक्ति प्राप्त झाली म्हणजे कोणत्याही परिस्थितीत व्यथित होत नाही. ती अवस्था म्हणजे नित्य तृप्ति ही बाहेरून प्राप्त होत नसते. पूर्णत्व व समाधान आतूनच मिळत असते. बाळाला आईचे प्रेम अनुभवात असते, त्या प्रतीतीने त्याने आईच्या प्रेमाची आळवणी करणे हे भक्तिसुख आहे. आई टाकून नसता ( प्रभुप्रेम-रक्षण प्रतीतीत नसता ) आई भेटण्यासाठी जे उपाय व

कष्ट घडतात त्याला भक्ति हे नाव शोभणार नाही. भक्ति म्हणजे प्रीती अनुभव आहे ती प्रीती जीव कोठून आणू शकणार नाही. प्रभूचे जीवावर जे अनिवार प्रेम आहे (आणि तेंच प्रेम, त्या जीवाला स्वतःचे स्वतःवर असलेल्या प्रेमात स्पष्ट होते) ते प्रेम जो प्रतीतीत घेतो. त्या सुखाने बोधाने वावरतो, त्या सर्व क्रिया भक्तीच्याच होत. देवाला शरण जाणे असले तर हे प्रेमप्रभूशी एकरूप असलेले जाणण्यानेच असू शकेल.

'पै आपुले नि भेदेवीण । माझे जाणिजे एकपण । तयाची नाव शरण । मज येणे गा ॥ ज्ञा.

मधुप्रेम ही माधुर्याची गंगा आहे. ती नामगंगेला मिळते. नामगंगा चैतन्य-सागरला भेटून परम शांतीप्रसाद देते. परम प्रियतम श्रीकृष्णाच्या दारूण वियोगाने फोडलेल्या डोळयातून अश्रूंची धार सतत वहात आहे. अशा स्थितीत 'हरे कृष्ण हरे कृष्ण । पांडुरंग हरि वासुदेव हरि । राधे गोविंदु जयो' ह्या नामगदारोळात वारंवार सुस्कारे टाकीत 'हे हरे रमणा गोविंदा वैकुंठवासिन् प्रभा माधव मुकुंदा" ह्या नामसंकिर्तनाचे जय घोषात तहान नाही भूक नाही आपटत धोपटत पडत बिल्वमंगल गावोगाव भटकत राहिला. शुद्ध प्रेमाच्या विरहात भक्त रडत असतो तो आपत्तींना भीत नसतो तो सर्व सहन करतो इतकेच नव्हे तर तो कोणत्याही त्याबद्दल दोष देत नसतो.

मेघानी जर पाऊस पाडला नाही तर चातकपक्षी त्याच्यावर नाराज होत नाही.

बरसि परुस पाहन पयद पंख कर टक टूक ।
तुलसी परी न चाहिए चतुर चातकहि चूक ॥
चढत न चातक चित कबहुँ प्रिय पयोदके दोष ।
तुलसी प्रेमपयोधिके तहां न माप न जोष ॥

प्रेम जेव्हा स्वार्थास व कामनेने विटाळते त्यावेळेस प्रेमात दोष दिसतात कारण त्यात देणे-घेणे-मापणे याचा व्यापार चालतो, परंतु शुद्ध व निर्मल प्रेमा-शिवाय काहीच रहात नाही, अशा शुद्ध प्रेमाला भुलून ईश्वराला येणे भाग पडते.

प्रेमी भक्ताचा टाहो श्रवण करून भगवंत बाल वेषात आले, व मुनी आपल्या मन-मोहिनी मधुर वाणीत बोलू लागले. 'सुरदासजी! आपणास पुष्कळ भूक लागली आहे ना! मी आपणाकरिता थोडीसी मिठाई व पाणी आणले आहे ते घ्या. बिल्वमंगलला त्या बालकाच्या बोलण्यानेच समाधान झाले होते तो प्रसाद खाऊन तो त्या बालकाला म्हणाला "भैया! तुझे घर कोठे आहे? तुझे नाव काय? आणि तू काय करतोस? बालक म्हणाला "माझे घर! कुठे बरे! हो जवळच आहे. मेरा कोई खास नाम नही! जो मला ज्या नावाने पुकारतो त्या नावाने त्याला मी भेटतो व बोलतो! मी गाईंना चारावयास नेतो. माझ्यावर ज्याचे

प्रेम असते त्याच्यावर मीसुद्धा प्रेम करतो "! तो पुढे म्हणाला, 'मी दररोज येईन व आपणास मिठाई व पाणी आणीन'.

बिल्वमंगल-भैया ! फार चांगली गोष्ट आहे तू दररोज येत जा ! बालक निघून गेला व बरोबर बिल्वमंगलचे मनही चोरून नेले.

ज्याच्या शोधात बिल्वमंगल सर्वस्वाचा त्याग करून भटकत राहिला गोवर्धन उचलून प्रजाचे रक्षण करणारा भगवंत भक्तावर कृपा करण्यास प्रकट झाला. दावाग्नि गिळून गोपाळास शांति देणारा श्रीकृष्ण बालक रूपाने मिठाई व पाणी घेऊन आला–ह्याचा बोध अद्याप त्याला झाला नव्हता. बाह्य पदार्थांच्या मानाने इंद्रिये वरची, इंद्रियापेक्षा मन श्रेष्ठ मनापेक्षा निश्चयात्मकबुद्धी श्रेष्ठ व बुद्धीच्या पलिकडे तो आत्मा-'अहं' बुद्धि मनाचे स्वाधीन व मन इंद्रियाधीन झाले तर अवनति होते. हे जाणून तो संकटातून-मोहातून सुटून अंधस्थितीत इकडे आला, तो परत नवीन संकट दत्त म्हणून उभे स्त्रीच्या मोहजाळ्यातून सुटका करून घेतली तर आता बालकाचे मोहाने घेरले ! काय करावे असा संचित विचार करीत बसला. तोच वेशधारी भगवंत बालक आले. व म्हणाले बाबाजी उगा-मुगा काय बसलात, कसला विचार करता ! वृंदावनला येता का ? वृंदावनचे नाव ऐकताच अंगावर रोमांच उभे राहिले. आनंद झाला पण असमर्थता पाहून म्हणाला 'भैया मी अंध आहे, वृंदावनला कसा जाऊ ? बालक म्हणाला, या काठीला धर व मी हे टोक धरतो. याप्रमाणे भगवान पुढे व भक्त मागे मागे चालले. वृंदावन आल्यावर बालक म्हणाला 'पहा ! वृंदावन आले."

भगवंताचा वरप्रसाद हा अनुग्रहस्वरूपात भक्तांचे ठायी दृष्टोत्पत्तीस येतो, हे भगवंताचे सगुणलीला–ऐश्वर्य आहे. जीवाला भगवद्विषक तळमळ पाहिजे. परमात्मा तळमळीनंतर कोणत्याही सगुण स्वरूपात प्रकट होतो आत्मा वा ऽ रे द्रष्टव्यः श्रोतव्यो मंतव्यो, निदीध्यासितव्यः असा अनुभव स्वसंवेद्य स्वरूपात भक्तांचे ठिकाणी असतो आतील स्फूर्ति–चित्कला जागृत होऊन सुगंधाच्या नंदनवनात विश्वकांत श्यामसुंदर प्रभू आपले सान्निध आहे असे बिल्वमंगलला उमजले व त्यानी झटकन काठी सोडून बालकाचा हात पकडला त्याच्या भक्तीच्या सर्वेंद्रियात प्रभूकृपेचा अरुणोदय झाला व भगवंताचे दिव्य स्पर्शाने तो कृतार्थ झाला श्यामसुंदर बालकाचा हात घट्ट पकडून ठेवला व आता तुला सोडणार नाही असे म्हणाला. भगवान म्हणाले हात सोडतोस की नाही ? नाही ! नाही !! नाही !!! त्रिकाल नाही, भगवंताने जोरात झटका देऊन आपली सुटका करून घेतली परंतु बिल्वमंगलने प्रभूला प्रेमरज्जूने बांधल्यामुळे त्याला ती प्रेमगाठ सोडता आली नाही. हात सुटल्यावर बिल्वमंगल म्हणाला, कुठे जातोस ? स्मरणात तर तू आहेस !

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम ।

जो भक्त ज्याप्रमाणे भजतो त्याप्रमाणे त्याला मी भजतो.

भक्ताच्या प्रेमाकरिता भगवंत प्रकट होऊन त्यास सुखाविते वैकुंठातील सुखापेक्षा भक्तवृंदावनतील सुख मोगण्यास भक्तांचा लळा पुरविण्यास भगवंताला सुख वाटते. बिल्वमंगलच्या डोळ्यावर हात फिरवता क्षणीच त्याला दृष्टी आली व तो श्री भगवंताच्या दर्शनाने बेहोश झाला व भगवंताच्या चरणावर लोळण घेऊन प्रेमाश्रुने भगवंताचे पाय धुतले. भगवंताने त्याला मिठी मारली व देव–भक्तांचे मधुर मिलन झाले. हरिनामाच्या ध्वनीत सर्व आकाश निनादले व पुढे भक्ताच्या सांगण्याप्रमाणे. वेश्या, सावकार व त्याची भार्या याना दर्शन दिले; व भगवान गुप्त झाले.

आई सर्व काळ सांभाळीत आहेच. ती सांभाळणारच या एकपणाच्या निश्चित बोधाने. आईबाळामध्ये भक्तिसोहळा सुरू होतो. या उलट इतर शास्त्रांच्या मार्गाने राजा व रयत. धनी व चाकर यांच्यामधील वरिष्ठ कनिष्ठ असा दीनपणांचा सेव्यसेवक भाव तयार होतो. त्या क्रियांना ते भक्ति नाव देतात ते संपूर्णतः चुकीचे आहे. संतबोध प्रेमाच्या रतीला (आवडीला) प्राधान्य देतात. ती प्रेमरती जीवाला धरता आणता येण्यासारखी नसून प्रभु प्रेमरूपा मधून जीवात उमटत असतो. त्या सुखाने ऐक्याने प्रेमाचे स्मरण असणे, त्या स्मरणात ज्या क्रिया ज्या भोग आसक्तिच्या क्रिया घडतील त्याचे नाव भक्ति आहे. वल्लभा आणि कांता, यांच्या अनुरक्ति प्रितीने ज्या वेधक्रिया होतात त्याचे नाव कामक्रिया होय. त्या सर्व कामांचा, सुखांचा आराम ज्या निरुपचार प्रेमस्वरूपातून (गोडीतून) व्यक्त होतो त्या गोडीच्या आसक्तींत प्रभूचे जे आघक होतात, त्याचे सर्व विहार भक्तिमय असतात. प्रेमसुखाच्या गोडीने त्या सुखात विरण्याची अवस्था ती भक्ति होय.

बिल्वमंगल प्रेमानंदात तल्लीन झाला. आणि कृष्णभक्तीचा प्रचार करू लागला. • •

# साईबोधामृत

## अर्वाचीन भक्तलिलांमृत अध्याय ३२

(ले. द. शं. टिपणीस)

### संसार

हा ग्रंथ पुढे चालू ठेवण्यास परमेश्वरी कृपेची याचना करून दासगणू साईबाबांचे संसारा संबंधी बोल सांगत आहेत. गरिब श्रीमंत, लहान मोठे ज्ञानी सर्व जण संसार करीत असतात. यामुळे संसारासंबंधी बाबांनी चांदोरकराना जे सांगितले ते सर्वानाच उपयुक्त आहे. म्हणून या अध्यायात गुरु शिष्याचा या संबंधीचा संवाद जरा विस्ताराने दासगणू सांगताहेत.

नानासाहेब चांदोरकर, निमोणकर आदी मंडळी बाबांच्या दर्शनास येतात. नाना बोलतात, "हे करुणा निधि, या संसाराचा कंटाळा आला. पुरे आता हा संसार. माझ्या संसार शृंखला तोडून टाका. वीट आला सर्व शास्त्रे सांगतात की संसार असार आहे. खरं असावं हे. इतके वर्षे संसार करतोय पण हाती काही लागलं नाही. जो जो संसाराच्या मागे लागावे तो तो दुःखच अधिक हाती येतं. आशा माणसाला नाचवीत असते. शोधूनही संसारात सुख मिळत नाही. कंटाळलो आता या संसाराला, हे असलं वेड तुझ्या डोक्यात कोठून शिरले? तुझी कल्पना मोहक आहे. तुझं म्हणणं खरं आहे तोंपर्यंत संसार आहे व तो पाठिशी सदैव लागला आहे. देहापासून पाठ कधी निराळी करता येईल काय? मग तू तरी संसारापासून निराळा होणार कसा? संसार कोणास चुकला नाहीं. मलाही चुकला नाही. मी ही त्यात गुंतून पडलो आहे. मलाही तो सोडता येत नाही. मग तू कसा सोडू शकशील? संसाराची अनेक रुपे आहेत. ती मी तुला सांगतो. ऐक. देह हाच एक संसार आहे. देहासंबंधी नैसर्गिक कृत्ये करणे, देहाच्या सर्व हालचाली हा संसारच आहे. देहात असलेले काम क्रोध मद मत्सर यांचा वावर हा ही आणखी संसार आहे; मनाचे सर्व व्यापार हा मानसिक संसार आहे. तिसरा तुझा, तू तुझे सर्व सगे सोयरे समजा राष्ट्र या सर्वांमध्ये एकमेकाशी चालणारे व्यवहार हा संसारच आहे. या तिहीचे मिश्रण होऊन मानवी जीवन बनते. यातला तिसरा म्हणजे तुझा संसार तुला नको. त्याला तू कंटाळला आहेस पत्नी, पुत्र, कन्या आदीना सोडून तू जंगलात गेलास तरी संपूर्ण संसार कधीच सुटायचा नाही. तिथे मानसिक संसार मोडशील." चांदोरकर बोलले, "बाबा, तुम्ही म्हणता तो तिसरा संसार मला नको. त्या संसारात नाना प्रकारच्या दुःखा खेरीज काही नाही. पहिला संसार ईश्वर निर्मित आहे. तो केलाच पाहिजे. त्याला उपाय नाही. दुसराही तसाच." बाबा बोलले, पण तिसरा? तुझा तूच निर्माण केला आहेस. तुझा तूच वाढवला आहेस. तेव्हा तुझा तूच राखला पाहिजेस. पूर्वीच्या क्रियामाण संचीताचे फळ म्हणजे देह प्रारब्ध, सर्व जन्माचे मूळ हे देह प्रारब्ध आहे, गरीब श्रीमंत उच्चनीच पशुपक्षी सर्वांच्या अस्तित्वाला कारण प्राण आहे. हा प्राण सर्वाठायी सारखाच आहे असं असता बाह्यस्वरूपात भिन्नता विविधता विषमता का असावी याचा तू विचार केला आहेस काय? नाना योनी नाना प्रकार जगात आहित जैसी योनी तैसे लक्षण व तैसा संसार. मग त्याला कंटाळून कसं चालेल? असं पहा. कोणी ऐष आरामात राहून पंच पक्वान्ने खातात तर कोणी भिक मागून तुकडे मोडतात. कित्येक गर्भ श्रीमंत होऊन महालवाड्यात राहतात तर कित्येक सडकेवर उघड्यावर निजतात. कित्येकाना मुले होतात व जगतात, कित्येकांची मरतात. कित्येकाना होत नाहीत तर कित्येक लटांबराला कंटाळून जातात. सगळे सिंह सारखेच पण काही स्वातंत्र्य भोगून वनराज म्हणून मिरवतात. तर काही गुलाम होऊन सर्कशीत हुकमाचे ताबेदार होतात. सगळे कुत्रे सारखेच, पण काही श्रीमंताच्या

संगतीने सुखाने राहतात तर गाव कुत्री पोटासाठी गावभर वणवण भटकतात, कैक गाया उत्तम पेंड खाऊन धष्टपुष्ट होतात तर कित्येकींना चाऱ्याचा घासही महाग होतो, अशा प्रकारच्या जगातील कमी अधिकपणाला कारण देह प्रारब्ध, भोगल्या विणा कालत्रहि सुटका नाही. हे प्रारब्ध सर्व भेदाभेद करते."

यावर चांदोरकर म्हणाले, "बाबा, तुम्ही म्हणता ते खरं. माणूस संसाराला कंटाळतो तो दुःखामुळे दुःख नकोसे वाटते. मूळात हे दुःख व्हावेच कां? संसारात पदोपदी दुःखेच फार. हा प्रपंच म्हणजे सुखापेक्षा दुःखाचीच खाण आहे. तिचा त्याग केला की मग दुःख कोठून होणार? म्हणून हा प्रपंच नको," यावर बाबा बोलले "अरे संसारातील सुख-दुःखे खरी नव्हेत. लोक त्यांना सत्य म्हणून समजतात. हे भ्रांतीचे पटल आहे, ज्याला पक्वान्ने मिळतात तो स्वताला सुखी समजतो व ज्याला कोरडी भाकर मिळते तो दुःखी होतो. पक्वान्ने नि भाकरी यांच्या कार्यात काय फरक आहे. दोहोंचे कार्य एकच, पोटाची भूक भागवणे. उंची कपडे वापरणे सुखावह वाटते पण वल्कले नेसणे दुःखी वाटते. दोघांचे कार्य एकच, शरीर रक्षण, पण एक मानतो सुख व दुसरा मानतो दुःख, सुख दुःख हे मानण्यावर आहे. असं मानणे हे अज्ञान आहे, या अज्ञानाने सगळा घात केला आहे. सुख दुःखादी भावनांचे तरंग आपल्या ठिकाणी उठतात. पण तो भास आहे. त्यांचा मोह धरू नको. तू म्हणशील तरंग कशावर तरी उठावे लागतात. जसं जला शिवाय तरंग नाहीत किंवा दीपाविना उजेड नाही. तसेच सुखदुःखाचे तरंग उठतात तरी कशावर असं तू विचारशील, तर त्याचे उत्तर लोभादी षडरिपू हे तरंग उत्पन्न करतात. धनीकाचे धन पाहून दरिद्रीच चडफडतो कारण त्याच्या ठिकाणी मत्सर उत्पन्न होतो. मला हे हवे अशी जी हाव सुटते ती लोभामुळे सुखदुःखाला कारण षडरिपू आहेत, त्यांना प्रथम जिंकले पाहिजे, पण त्यांचा पूर्ण नायनाट करु नये. त्यांना गुलाम करुन नोकरांप्रमाणे चाकरीस लावावे. साधारण लोक षडरिपूचे गुलाम असतात. त्यांच्या आज्ञेत ते वागतात. संसार सोडून संन्यास घेतला म्हणजे षड्रिपू जिंकले असे समजू नकोस, ते जिंकण्याचा संन्यास हा मार्ग नव्हे विवेक वैराग्याने ते जिंकता येतात. त्यांना गुलाम करुन त्यांच्यावर ज्ञानाला जमादार करावा व त्याच्याहीवर सद्विचार शक्तीला नेमावे म्हणजे या खोट्या सुख दुःखाची तुला बाधा होणार नाही खरे सुख म्हणजे कोणते ते सांगतो मोक्ष हे खरे सुख व जन्ममरण फेरा हे दुःख, या खेरीज बाकी सर्व भ्रामक आहे.

आता संसारात कसे वागावे ते सांगतो, नीट ऐक, देहप्रारब्धानुसार प्राप्त परिस्थीतीत समाधानाने राहवे. उगाच असं असावं अन् तसं असावं अशा खोट्या कल्पना करू नये. परीस्थितीला सोडून आशा बाळगू नये. अधिक उन्नत होण्याची महत्वाकांक्षा जरुर बाळगावी. त्या साठी प्रयत्न व श्रम उणे पडू देऊ नयेत. फळे आल्यावर वृक्ष जसे वाकतात तसे दैवयोगे संपत्ती मिळाल्यास वृक्षा प्रमाणे लीन व्हावे

नम्र होणे चांगले पण सर्वाठायी नव्हे, समाजात दुष्ट लोक असतात. यास्तव सुष्ट कोण दुष्ट कोण हे पारखून वागावे. दुष्टाला नम्रपणा दाखवू नये. धनिक नम्र व उदार असला की दुष्ट लोक त्याचा भलताच फायदा घेतात. म्हणून दुष्टाशी कठोर पणेच वागले पाहिजे. असं न केलं तर ते त्याच्या दुष्टपणाला उत्तेजन दिल्या सारखे होईल संत व सज्जन यांचा मान राखावा, त्यांच्याशी नम्रपणे वागावे, धनाचा गर्व वाहू नये व त्या मदाने दुसऱ्यास छळू नये, प्रपंच अशाश्वत असला तरी प्रारब्ध सत्य आहे. यामुळे प्रपंच करायला हवा, शरीरास जशी पित्ताची आवश्यकता आहे. तशी प्रपंचास धनाची जरूरी आहे. ते प्रामाणिक पणे श्रम करून मिळवावे, पण त्यातच सदैव मनाला गुंतवून ठेवू नये. मिळाल्या धनातून योग्य तो दानधर्म करावा. आदा पाहून खर्च करावा. उधळपट्टी व चैनबाजी करु नये पण कृपण ही असू नये. उदार असावे पण फाजील उदार असू नये.

योग्या योग्य पहावे. उधळेपणा म्हणजे उदारपणा असा विपरीत समज नसावा. कारण आपल्या जवळचे द्रव्य संपले की समाजातील कुणाही आपणास विचारणार नाही. पंगु, अनाथ, रोगग्रस्त, समाज कल्याण करणारे सार्वजनिक कार्य, विद्वान, अनाथ स्त्रीचे बाळंतपण हे द्रव्य दानास योग्य आहेत, आता अन्न दानाबद्दल सांगतो. अन्नदानाचे तीन प्रकार आहेत. विशेष, नित्य, कार्याकारण संपत्ती मिळाल्यामुळे वा चांगला काळ आला म्हणून सद्इच्छेने केलेले अन्नदान म्हणजे विशेष अन्न दान होय. भंडारा वा प्रयोजन हेही विशेष दान आहे, या दानात कोणताही लहान मोठा उच्च नीच, सुष्ट दुष्ट, असा भेद नसावा, तापसी, संन्याशी, माधुकरी मागणारे विद्यार्थी यांना अन्नदान करणे हे तिला अन्नदान आहे. लग्न, मौजीबंधन, सण, उद्यापन आदी कार्यात केलेले अन्नदान हे कार्याकारण अन्नदान होय. याचप्रमाणे वस्त्रदानाचे आहे, हे लक्षात ठेव की आपल्या अंगी दानाची ताकद असल्यास परपीडा निवारण करण्यास तिचा उपयोग करावा.

समाजाला रुचेल असा पोषाक करावा. फाजील चोचले करु नये. अहंपणा व तोरा दाखवू नये. निष्कारण कोणाचा अपमान करु नये. सज्जन दुर्जन ओळखून असावे कन्या, पुत्रादी नातेवाईक, नोकर चाकर हे देह प्रारब्धामुळे प्राप्त होतात त्यांना प्रेमाने वागवावे, माझे माझे म्हणून वृथा अभिमान करू नये. कारण हे देह प्रारब्ध याच जन्मापुरते आहे, मागील जन्माचे आहे का गणगोत या जन्मी? हे प्रारब्ध याच जन्मी सरून अंती त्यांचा लेशही उरणार नाही. उरतील त्या त्यांच्यामुळे निर्माण झालेल्या वासना आशा अकांक्षा. या वासनाच पुढील जन्मास कारणीभूत होतात, म्हणून आप्तस्वकीयांच्या मोहात पडू नये. त्यांच्यावर फाजील ममता करू नये. तरच अक्षय सुखाचा लाभ होईल. प्रपंच म्हणजे धर्मशाळा आहे. दो दिसांची दुनिया. धर्म शाळेचा मोह कधी आपण धरतो कां? तसंच प्रपंचाबद्दल. संसारात प्रत्येकाने आपले कर्तव्य करावे. सदैव त्या दयाघन परमेश्वराची आठवण ठेवावी.

जगातील सर्व मुले देवानेच निर्माण केली आहेत. त्यामुळे ती सर्व सारखी आहेत हे खरे. तरी पण आपल्या मुलांची जबाबदारी प्रारब्धाने आपल्यावर दिली आहे. आपल्या मुलांना योग्य शिक्षण देऊन त्यांना जीवनास लायक बनविणे हे आपले कर्तव्य आहे. त्यांचे चांगल्या प्रकारे संगोपन करावे. पण मीच मुलांना शिकविले. त्यांच्यासाठी असे केलं अन तसं केलं. त्यांच्यासाठी मी पैसा ठेवला असा अभिमान धरू नये असं कधी मानू नये, कर्तव्य चोख बजावणे हे आपले का, त्याचे कर्तृत्व देवाला द्यावे. कर्ता करविता ईश्वर आहे. आपण नव्हे अशी भावना असावी, कर्तव्याला आलेले फळ देवाचे देवास द्यावे. आपण अलिप्त रहावे. सारासार विचार शक्तीचा उपयोग करून चांगले वाईट ओळखावे. चांगल्याला पाठिंबा द्यावा. व त्याची संगत करावी पण वाईट टाळावे. काही तरी चांगले कार्य सतत करीत रहावे, नाना प्रयत्नांनी ते शेवटास नेण्याची कोशीस करावी, शारीरिक व बौद्धिक ताकद असल्यास काही चांगला पराक्रम करावा. निमोल्या प्रमाणे कुठे तरी पडून राहू नये. चांगल्या पराक्रमातच पुरुषार्थ आहे. जीवनास सर्वतोपरी जपले पाहिजे हे खरं असलं तरी मेलेल्याचा शोक करू नये. मरण म्हणजे उसने घेतलेल्या पाचाची (पंचभूते) परत फेड आहे. तीं ज्याची त्यास देऊन टाकणे म्हणजे मरण, मुलाच्या जन्मामुळे फाजील आनंद करु नये की मरणाचा शोक करू नये. पिके आली म्हणून पावसाला वा भूमीला कधी आनंद झाला आहे का की ती बुडाली म्हणून त्यांना दुःख वाटले आहे ? अशा समदृष्टीने जीवन जगले तर सुखदुःख वाटणार कोठून ? सुख दुःखाचा अभाव म्हणजे मुक्त स्थिति. " एवढे बोलून बाबा थांबले.

बाबांचा उपदेश ऐकून चांदोरकर व इतर भक्त गहिवरले. आनंदाश्रु त्यांच्या डोळ्यातून वाहू लागले. बाबांच्या चरणावर मस्तक ठेवून सर्वांनी त्यांचा निरोप घेतला, बाबांनी सांगितलेल्या नितीचे जो कोणी मनःपूर्वक पालन करीत त्याना भवबाधा बाधणार नाही असा आशिर्वाद देऊन दास गणू हा अध्याय संपवितात.

॥ श्रीसाईनाथार्पणमस्तु ॥ ० ० ०

# श्री साईनाथ

## (श्रीसद्गुरू साईमहाराज ललित चरित्र)

० र. श्री. पुजारी पुणे ०

### ४७. हा गयावळ कोणाचा मुनीम होऊन तर आला नसेल !

श्रीक्षेत्र गया येथील धर्मशाळेत त्या रात्री शे-शंभर यात्रेकरू उतरले. ते सर्वजण निरनिराळया प्रांतातील होते- भिन्न भिन्न भाषा बोलत होते. पण सर्वांच्या तोंडी एक शब्द पुनः पुन्हा ऐकू येत होता. तो शब्द म्हणजे ' प्लेग ! '

अप्रिय बातम्या कानावर फार लवकर येतात. आगगाडी पेक्षाही अधिक वेगाने त्या सर्व दिशांना धावत असतात. प्रत्यक्ष सार्थापेक्षा भीतीनेच माणसाला निम्मे करतात. मग तो मनुष्य कितीही धीराचा असो किंवा 'जन्मलेला आणि एक ना एक दिवस मरणारा त्याहे' हे तत्त्वज्ञान अहोरात्र बोलणारा, दुसऱ्यांना शिकवणारा असो.

गयेला प्लेगची साथ सुरू आहे ही बातमी माणसे आगगाडीतच बोलत होती. पण करणार काय? गाडीतून मधेच या परमुलखात कोठे उतरणार? त्यापेक्षा सरळ गयेस जावे. उरली सुरली रात्र स्टेशनवर किंवा जवळच्याच धर्मशाळेत जागून काढावी. पहाट होताच मिळेल त्या गाडीत बसून परतीचा प्रवास सुरू करावा!

साहजिकच बहुतेक सर्व यात्रेकरूनी पहाट होण्यापूर्वीच धर्मशाळेतून गाशा गुंडाळला. शिर सलामत तो पगडी पचास या व्यावहारिक विचाराने तिकीटे काढून आपापल्या गावची वाट धरली. होता होता जवळ जवळ सर्व धर्मशाळा पहाटेपूर्वीच ओस पडली.

याला अपवाद झाली ती धर्मशाळेच्या एका कोपऱ्यात उशाशी गाठोडी घेऊन घोरत असलेली दोन माणसे! अरुणोदय होऊन सर्व धर्मशाळा लाल प्रकाशाने भरली तरी ही माणसे अजून डारढूर झोपलीच होती! चक्क घोरत होती! जणू हे दोघेजण आपल्या गावी, आपल्या घरीच सुखाने झोपले होते!

तोंडावर प्रकाश आल्यामुळे त्या दोघांची झोप थोडी चाळविली जात आहे, उशाखालचा हात काढून ते दोघे या कुशीवरून त्या कुशीवर होत आहेत तोच एक गयावळ म्हणजे क्षेत्रोपाध्याय त्या ठिकाणी येऊन पोचला

डोक्यावर लाल रेशमी उंची पागोटे. कानात अस्सल मोत्यांची उंची भिकबाळी. अंगावर अस्सल जरीकाठी उंची उपरणे. दोन्ही हाताच्या बोटात हिऱ्यांच्या मौल्यवान आंगठ्या.

तो मनुष्य आपल्या नोकरांना म्हणाला, "ते दोघे इसम कोण आहेत? त्यांना चांगले गदगदा हलवून उठवा! म्हणावे; अहो उठा! पूरी यात्रा यहाँसे निकल गई! आप दोनो तो अभी सो पडे!"

नोकरांनी गदगदा हलविल्यानंतर त्रस्त चेहऱ्याने ते दोघे उठून बसले. रात्रभर जागरण झाल्यामुळे डोळे किलकिले करून प्रश्नांकित चेहऱ्याने त्या सर्व व्यक्तींकडे पाहू लागले. तोच तो श्रीमंत गयावळ हसत हसत पुढे होऊन म्हणाला. "आपणास झोपेतून उठवून तसदी दिली याबद्दल क्षमा असावी. पण एक गोष्ट निदर्शनास आणतो. ती अशी की येथे प्लेगची साथ सुरू आहे. सर्व यात्रेकरू निघून गेले. आपण दोघेच येथे उरला!"

त्या गयावळाने दिलेली ही भीतीदायक बातमी ऐकून सुद्धा त्या दोघांच्या चेहऱ्यावर भीतीचे यत्किंचितही चिन्ह दिसेना तेव्हा तो गयावळ म्हणाला, "आपणास गावात यायचे आहे काय? येणार असल्यास माझी काही हरकत नाही. मी राहातो त्या भागात साथ नाही. हवा चांगली आहे."

गयावळाच्या सूचने प्रमाणे ते दोघे शहरात येण्यास तावडतोब तयार झाले.

धर्मशाळेच्या बाहेरच्या बाजूस उत्तम घोड्यांच्या दोन गाड्या उभ्या होत्या. त्यापैकी एका गाडीत त्या दोघांना घेऊन तो गयावळ बसला. दुसऱ्या गाडीत ते सर्व नोकर बसले. गाड्या मोठ्या डौलाने शहरातील त्या गयावळाच्या वाड्यावर निघाल्या.

त्या दोन यात्रेकरूंपैकी एक यात्रेकरू मनाशी विचार करू लागला. म्हणाला: पैसा असेल त्याच्याकडे वैभव असेलच असे नाही. त्यातून मास्तर असलेल्या माणसाला त्याच्या गावच्या पलिकडे कोण काय विचारणार! पण या माधव मास्तराचे नशीब कसे आहे बघा! जेथे जाईल तेथे बसायला घोड्याची गाडी! जेवायला चांदीचे ताट! झोपायला मऊ मऊ गादी! वर, निघतेवेळी, हातावर कोणी शंभर रुपये ठेवणार! कोणी दोनशे रुपये ठेवणार! पायावर डोके ठेऊन म्हणणार, "आमचे भाग्य मोठे! तुमचे पाय या वास्तुला लागले! असाच कृपालोभ असू द्यावा."

गावच्या नंदराम मारवाड्याकडून शंभर रुपये हातउसनवार घेऊन हा माधव मास्तर यात्रेला निघाला. काकासाहेब दीक्षितांच्या मुलाच्या मुंजीसाठी नागपुरला गेला. तर त्यांनी काढून दोनशे रुपये हातावर ठेवले! तेथून ग्वाल्हेरीस नानासाहेब चांदोरकराच्या मुलाच्या लग्नाज गेला. तर तेथे नानासाहेबांनीही हातावर शंभर रुपये ठेवले! शिवाव त्याचे व्याही श्रीमंत जठार यांनी शंभर रुपये दिले! म्हणजे गावात घेतलेल्या कर्जाच्या चौपट रक्कम केवळ बक्षिसी मिळाली. शिवाय वर शेलापागोटे मान सन्मान लग्नात दोन्ही बाजूंनी झाला तो निराळाच! जणू मानकऱ्यामधील पहिल्या नंबरचा मानकरी हा!

एखाद्याचे जन्मग्रहच राजैश्वर्य भोगण्याचे असल्यास नकळे! आम्हीं काशीस जाणार, अयोध्येस जाणार एवढे बोलण्याचा अवकाश, श्रीमंत जठार आमच्यापुढे दोन्ही हात जोडून, आपली सेवा काय करू सांगा म्हणून उभे!

काशीस मंगळघाटावर श्रीमंत जठारांचे जडावाचे सुंदर कोरीव काम केलेले स्वतःच्या मालकीचे श्री लक्ष्मी-नारायणाचे सुंदर मंदिर! अयोध्येसही स्वतःच्या मालकीचे श्रीरामाचे मंदिर! दोन्ही ठिकाणच्या मुनीमांना पत्रे पोचण्याच अवकाश, जो आदरसत्कार झाला त्याला तोड नाही. जणू आम्ही कोणी राजघराण्यातील व्यक्ती! शेकडो जन्माचा त्यांचा-आमचा जणू ऋणानुबंध!

रामनवमीच्या उत्सवास आम्ही अयोध्येस! एक नव्हे, दोन नव्हे एकवीस दिवस तेथे मुक्काम! तीच गोष्ट काशीस. तेथे तर दोन महिने मुक्काम! नावेत बसून गंगेच्या पात्रातून मनमुराद फिरावे! उत्तम मेवामिठाई खावी सकाळ-संध्याकाळ आटीव दूध प्यावे! अशी तैनात कोणी कोणाची कधीही राखली नसेल! या दोन महिन्यात चंद्रग्रहण, सूर्यग्रहणाची पर्वणीही होऊन गेली. रोज पहाटे गंगेवर स्नान विश्वेश्वराचे दर्शन दानधर्म असे दोन महिने पडले!

ग्वाल्हेरीहून आधी मथुरेला गेलो तर बरोबर पळस्प्याचे ओझे इनामदार! नानासाहेबांचे साडू बिनीवाले! नानासाहेबांचे जावई पंढारकर बड्या मंडळीच्या बरोबर असलेली मंडळीही बडीच!

तेथेही असेच स्वागत झाले. तेथून मात्र आम्हीच दोघेच प्रयागाला आलो. काशी केली. आता निघालो आहोत गयेला.

पण येथेही योग असा दिसतो की पुन्हा गाडीघोडे, नोकरचाकर, लाडू जिलेबी यांच्याशिवाय एकही दिवस खुला जाऊ नये!' बरोबर आहे! येथेही आमच्या मागे पुढे तो अनंत कोटी ब्रह्मांडनायक राजाधिराज श्री सच्चिदानंद सद्गुरू आहे! मग लोक आम्हास भाजीभाकरी खायला कशी घालतील! तूपरोटीच घालणार! गाद्यागिरद्यांवरच झोपविणार!

अप्पा कोते पाटील अशा विचारात गढले आहेत तर प्लेगाविषयी गाडीत अप्पांशी झालेले बोलणे या क्षणी माधव मास्तराना शब्दन शब्द आठवत आहे. मास्तर त्यांना गाडीत सांगत होते म्हणत होते—

"अप्पा, गरूडाच्या पिलांना सापाचे भय कसले! बाबांची आम्ही लेकरे. त्यांच्या अंगाखांद्यावर, मांडीवर खेळलेली. प्लेग नव्हे त्याचा बाप आला तरी आम्हांला तो का करणार? बाबांपुढे त्याचे काय चालणार!

तुम्हाला आठवते? मागे एकदा सकाळी उठल्या उठल्याच बाबांनी गव्हाचे दळण मांडले ते!

त्या दिवशी बाबांनी तोंड धुणे होताच हातात सूप घेतले. गव्हाच्या पोत्याजवळ गेले. मापाने गहू मोजून घेतले. गोणपाटाचा तो मोठा तुकडा घेऊन, जात्याचा टाव घोळून खुंटा घट्ट केला. मग अस्तन्या सावरून, कफनीचा घोळ आवरून, बैसका देऊन, पाय पसरून जात्याजवळ बसले. एखाद्या बाईप्रमाणे मान खाली घालून दळू लागले."

अकस्मात ती सर्व हकिगत अप्पांना आठवली. त्यामुळे तेच पुढे बोलू लागले. म्हणाले, "त्या दिवशी सकाळी हातातील भाकरी तव्यावर न टाकताच हात धुवून गावातील बायका मशिदीकडे धावल्या. बाबांशी झोंबाझोंबी करून जात्याचा खुंटा

त्यांच्या हातून काढून घेतला. पाय पसरून आपण दळू लागल्या. दळता दळता मेरा रिचवून, बाबांवरून केलेल्या ओव्या म्हणू लागल्या. "

एवढे ऐकून घेऊन, आनंदाने गहिवरून माधव मास्तर म्हणाले, "आणखी पुढे काय झाले आठवते? बायांचे ते प्रेम पाहून बाबांचा उसना राग नेयत्या क्षणी निवाला. म्हणाले तुम्हाला काय वाटले की हे पीठ चार भाग करून मी तुम्हांला वाटून टाकीन! ठेवा ते चार वाटे तेथल्या तेथेच! आल्या की फुकटखाऊ रांडा! धाव धावून मला लुटायला! "

बाबांचे हे शब्द ऐकून त्या बाया फजित पावल्या. चुरमुरल्या. आपापसात कुजबुजू लागल्या तेव्हा बाबा काय म्हणाले माहीत आहे? बाबा म्हणाले; उचला ते पीठ येथून! टाका ते गावाच्या शिवेवर नेऊन! ओढ्याच्या कडे कडेने!

अप्पा, बाबांनी जात्यांत भरडली ती आपल्या गावाच्या अवतीभवती भडकलेली महामारी! पटपट माणसे नेणारी ती पटकी! आले ध्यानी?

ती पटकी एक राहू दे. प्लेगाचीच साथ सांगतो तुम्हाला एक कहाणी. ऐका.

आपल्या शिरडीत एकदा प्लेगाची साथ आली. त्यावेळी उमरावतीच्या दादासाहेब खापर्ड्यांच्या मुलाला प्लेगाच्या गाठी उठल्या.

तो मुलगा वयाने लहान. त्याच्या अंगात ताप नुसता फणफणला हे बघून त्याच्या आईचे-वहिनीसाहेबांचे कोवळे मन कळवळले. डोळ्याचे पाणी खळेना. मुलाला मांडीवर आडवा घेऊन बाबांचा धावा करू लागल्या.

होता होता संध्याकाळ झाली- बाबांच्या फेरीची वेळ झाली. बाबा वाड्याच्या कोपऱ्यात आले. एवढे समजले मात्र—वहिनीसाहेब धावतच गेल्या. जाऊन बाबांचे पाय घट्ट धरले. रडू लागल्या. तेव्हा बाबा खाली वाकून, हळूवार शब्दांनी त्यांना धीर देऊन म्हणाले; उगाच काळजी का करता? आभाळ थोडे भरून आले आहे. ते एकदा पडून गेले की मोकळया झाला. पाऊस पडतो, तो काय उगाच! पीक पिकावे म्हणूनच पाऊस पडतो.

एवढे बोलून बाबांनी आपली कफनी कमरेपर्यंत उचलली. आपल्या मांड्यावरील चार प्लेगाच्या गाठी त्यांना दाखविल्या. म्हणाले; पाहिल्या या गाठी! कशा टवटवून उठल्या आहेत! कशा कोंबडीच्या अंड्या एवढ्या झाल्या आहेत! हे तुम्ही देवाला घातलेले साकडे आम्हाला ते असेच भोगावे लागते बरे आई!"

बोलता बोलता माधव मास्तरांचे डोळे भरून आले. भक्तीप्रेमाच्या अश्रूंनी एका क्षणात वाहू लागले. जणू बाबांच्या चरणांची पूजा या रेल्वेच्या प्रवासातही डोळ्यांतील गंगा-यमुनाजलाने नित्य घडत आहे!

थोडा वेळ गेल्यानंतर मास्तर पुन्हा बोलू लागले. म्हणाले, "आप्पा, ही झाली परमभक्त वहिनीसाहेबांची गोष्ट. पण जी कधी बाबांच्या दर्शनालाही झाली

नाही, अशा एका लोहारणीची गोष्ट सांगतो. ऐका. ती गोष्ट गावातसुद्धा फारशी कोणाला माहीत नाही. ''

मास्तरांच्या एकेका गोष्टीमुळे बाबाविषयी लोकांची उत्सुकता वाढली या वेळपर्यंत मास्तरांच्या भोवती किती तरी सहप्रवासी माणसे जमली. मराठी भाषा येत नसतानाही माणसे गोष्टीत रंगून गेली. जणू भाषेचा प्रश्न येथे नव्हताच ! प्रश्न होता तो भक्तीचा ती भक्ती या सर्व यात्रेकरूंकडे होती. त्यामुळेच ते मास्तरांकडे आकर्षित झाले. अर्धवट मराठीत तर अर्धवट हिंदीत सांगितलेल्या बाबांच्या गोष्टी आगगाडीच्या खडखडाटातही मोठ्या तल्लीनतेने ऐकू लागले.

मास्तर या लोहाराची गोष्ट सांगू लागले.

म्हणाले, " दिवाळीच्या धनत्रयोदशीचा दिवस. सकाळच्या वेळी धुनीत एक एक लाकूड टाकीत बाबा बसले होते. माधव नावाचा एक सेवेकरी त्यांच्या जवळ होता. मीही त्यावेळी तेथेच होतो. लाकडांनी चांगला पेट घेतला होता. धुनीची ऊब थंडीमुळे सुखावह वाटत होती. तोच बाबानी तो भयंकर प्रकार केला. ''

श्रोत्यांचे डोळे एकदम विस्फारले. आता पुढे काय घडणार याविषयी मन उत्कंठित झाले. काही श्रोते थोडे पुढेही सरकले. हे पाहून मास्तर म्हणाले, " कोणास कल्पनाही करता येणार नाही अशी फार भयंकर गोष्ट बाबांनी तेव्हा केली. पेटत्या निखाऱ्यात खुशाल हात घातला !

हा प्रकार प्रथम डोळ्यांनी पाहिला तो माधवने ! त्याला हे दृश्य पाहाणेही सहन झाले नाही. त्याने ओरडून मला हाक मारली. त्यासरशी मी धावलो. बाबांच्या कमरेला मागून घट्ट मिठी घातली. त्यांना जोराने मागे ओढले.

त्यांचा तो सुंदर गोरा गुलाबी जळका हात पाहून मी रडू लागलो. म्हणालो देवा ! अरे, काय करून बसलास हे ! माझा सबंध हात उभाच्या उभा जळून कोळसा कोळसा की रे झाला !

माझे बोलणे ऐकून बाबा भानावर आले. हाताला जणू काही झालेच नाही अशा आवाजात म्हणाले अरे ती लोहाराची बायको ! रांड नवऱ्याच्या धाकाने भट्टीचा भाता फुंकायला धावली. काखेत पोर !

ते एवढेसे पोरगे काय ! अचपळच ते काखेतून निसटले ! भट्टीत पडले !

त्या तान्ह्या पोरीला विस्तवातून काढायला गेला रे ! तर इकडे हा प्रकार होऊन बसला ! सबंध हातच भाजला ! शाम्या, भाजू दे रे मेला माझा हात ! त्याचे काय एवढेसे ! पण त्या पोरीचा जीव वाचला ! लाख मोलाचा जीव ! ''

अप्पा कोते पाटलांच्या ध्यानी बाबांच्या भाजलेल्या हाताचे रहस्य आता आले. त्यांनी मास्तरांकडे चौकशी केली. म्हणाले, " परमानंद म्हणून कोणी मोठा डॉक्टर नानासाहेब चांदोरकरांना पत्र लिहून तुम्ही आणविला होता ना ? त्याचे काय झाले ? त्या डॉक्टरानेच बाबांचा भाजलेला हात बरा केला म्हणतात. ''

अप्पांचे हे बोलणे ऐकून मास्तर खो खो हसू लागले. म्हणाले, "अहो, कोठले काय, आणि कोठले काय! बाबांनी आपला हात त्याला बघुसुद्धा दिला नाही. मग कोठले त्याचे औषध आणि काय! त्याने जो दवा आणला होता, तो राहिला जसाच्या तसा त्याच्या पेटीत! शिरडीची हवासुद्धा त्या दव्याला लागली नाही!"

अप्पांचा तसा चेहरा हे ऐकून प्रश्नांकित झाला. तेव्हा एकवार मोठ्याने मास्तर म्हणाले, "तुपाने चोळून, वर पान बांधून पट्ट्यांनी त्या भागोजीने रोज सकाळी हात चांगला करकचून बांधला की झाला बाबांचा दवा! मी एकदा राग येऊन या कारणावरून बाबांशी भांडलोसुद्धा. तेव्हा हसून बाबा काय म्हणाले माहीत आहे? म्हणाले शाम्या! माझा परमानंद डॉक्टर तो एक अल्लामालिक! तो एवढा समर्थ असताना या परमानंद डॉक्टराचे औषध मला का देतोस!"

नंतर एक दिवस ध्यानी आले की महारोगी भागोजी शिंद्याला बाबांना काही तरी सेवा पाहिजे! म्हणून रोज सकाळी पट्ट्या सोडण्याचा आणि पुन्हा बांधण्याचा हा खेळ! हात बरा होऊन गेला तरी हा खेळ कायम!

म्हणून अप्पा, मी तुम्हांला सांगतो की तुम्ही गप्प माझ्याबरोबर चला. कसलीही काळजी म्हणून करू नका. कारण आपण जाऊ तेथे बाबा आपल्या बरोबर आहेत! आपले सांगाती होऊन, आपले बोट धरून चालवीत आहेत!

अहो, आपण आगीत पडलो तरी बाबा आपणाला बाहेर काढतील! नदीत बुडालो तरी बाबा आपणाला वर काढतील! मग गयेतल्या त्या यःकश्चित प्लेगाची आपणास भीती कशाला असे छपन्न प्लेग येतील आणि जातील."

मास्तरानी असा धीर देऊन अप्पांना रात्री धर्मशाळेत आणले. बाबांच्या गोष्टी सांगून रात्रभर त्यांना जागविले. जगाच्या पाठीवरील कोणतेही गाव बाबांच्या भक्तांना परके कसे नाही, आपली सर्व व्यवस्था नागपूर, ग्वाल्हेर, अयोध्या, काशी, मथुरा यांच्याप्रमाणेच येथेही कशी लागणार हे सर्व पुनः पुन्हा त्यांना सांगितले.

ते सर्व आश्वासन आज पहाटेच खरे ठरले. एक श्रीमंत गयाबळ गाडीघोडे घेऊन स्वतःच त्यांना नेण्यासाठी तेथे आला! जणू हा मनुष्यही कोणा श्रीमंताचा मुनीम होऊन धन्याच्या हुकुमानुसार त्यांची बडदास्त उत्तम ठेवण्यासाठी आता जातीने येथेही हजर झाला!

### ४८ काशी-प्रयाग करून शाम्याच्याही अगोदर येतो की नाही बघ!

ह्या दोघा महाराष्ट्रीय यात्रेकरूंच्या फराळाची व्यवस्था जातीने पाहाण्यासाठी तो गयाबळ आत गेला. बाहेर येऊन पाहतो तर त्या दोघांपैकी एक मनुष्य रडत

असलेला ! एखाद्या लहान मुलाप्रमाणे आपल्या सदऱ्याच्या बाहीने नाक पुसत असलेला !

अशी रडणारी माणसे त्या गयावळाने पुष्कळ पाहिलेली होती. अशा प्रसंगी त्याने त्यांना धीर देऊन बोलते केले होते. या परमुलुखात निराधार वाटू नये म्हणून काही काळ त्यांना आपल्या कुटुंबात समाविष्टहि करून घेतले होते. काका, मामा, भाऊ अशा नात्यांनी ती माणसे तेथे रमलीही होती.

पण आजचे हे यात्रेकरू अगदी भिन्न परिस्थितीत येथे आले. देवावर भार घालून आले. अशावेळी प्लेगाने चोर पावलानें येऊन त्यांच्यापैकी एखाद्याला गाठले तर नसेल !

त्या गयावळाच्या मनात हाच एक तर्क दृढ होऊ लागला. तो गयावळही मनात घाबरला. तरी पण स्वताशी म्हणू लागला : या भागात प्लेगचा वारा सुद्धा नाही. असे असताना हा बिचारा यात्रेकरू उगाचच का रडत आहे ? माझी मनोदेवता मला स्पष्टपणे सांगत आहे की या यात्रेकरूंच्या केसालाही धक्का लागणार नाही. मग या यात्रेकरूच्या मनाचा धीर का सुटावा ? प्लेगाची हाय त्याने का खावी ?

तो गयावळ थोडे पुढे होऊन रडत असलेल्या मास्तरांना काही विचारणार तोच मास्तर म्हणाले, " भाईजी, ते पाहिलेत ? बाबा मजकडेच पाहून कसे हसत आहेत ! जणू म्हणत आहेत : शाम्या, काशी–प्रयाग करून बोलल्याप्रमाणे मी आलो की नाही तुझ्या अगोदर ! "

त्या गयावळाला मास्तराच्या या उद्गारांचा काहीच उलगडा होईना. मास्तरांनी बोट केलेल्या दिशेकडे तो नुसता पाहात राहिला. नंतर त्याच्या ध्यानी आले की तो मनुष्य त्या फोटोतील त्या साधूकडे पाहून रडत आहे ! फोटोतील त्या साधूला उद्देशून ' बाबा ' ' बाबा ' असे म्हणत आहे ! एकूण हा गहिवर, हे अश्रू, हे रोमांच, हे सर्व आनंदाचे आहे ! या परमुलुखात झालेल्या आकस्मिक भेटीच्या आनंदाचे !

एकंदर परिस्थितीचा उलगडा अशा रीतीने होताच त्या गयावळाचे मन भीती ऐवजी श्रद्धेने भरून आले. कपाळाशी दोन्ही हात जोडून तो मनात म्हणाला : या नश्वर जगात बायका मुलांसाठी रडणारेच फार ! देव किंवा गुरु यांच्यासाठी रडणारे फार थोडे ! विरळच खरोखर एका परम गुरुभक्ताचे पाय आज माझ्या घराला लागले ! आज पहाटेच त्याचे दर्शन झाले ! हे माझे परम भाग्य !

डोळ्यातील भक्ति प्रेमाचे अश्रु पुसून मास्तर त्या गयावळाला म्हणाले, " भाईजी, आमच्या बाबांची ही तसबीर आपणास कोठून मिळाली ? ही येथे कशी आली ? सर्व काही सविस्तरपणे मला सांगाल तर बरे. "

मास्तरांचा भाव ध्यानी घेऊन, त्यांच्या शेजारी बैठकीसमोर बसून ती सर्व जुनी हकिगत तो गयावळ सांगू लागला.

म्हणाला, "आम्ही गयावळ. या स्थानीचे क्षेत्रोपाध्याय. यात्रेकरूंची धर्मकृत्ये यथासांग करावीत; त्यांच्या राहाण्याची, भोजनाची नीट व्यवस्था लागावी या दृष्टीने दोन तीनशे नोकर मंडळी आम्हांस ठेवावी लागतात. ती सर्व भरतखंडभर ठिकठिकाणी विखुरलेली असतात. साहजिकच मधून मधून स्वतःही त्या त्या स्थानी जाऊन एकंदर कामावर देखरेख ठेवावी लागते.

सुमारे बारा वर्षांमागे तुमच्या महाराष्ट्रातील मनमाड, पुणतांबा या भागात मी आलो होतो. त्यावेळी तेथे कळले की शिरडी नावाच्या तेथील एका खेडेगावी साईमहाराज नावाचे एक फार मोठे साधू राहातात.

साधुसंतांच्या शुभदर्शनाची संधी दुर्लभ तो एक फार मोठा लाभ अर्थातच मी शिरडीस गेलो, बाबांचे दर्शन घेतले. ती दिव्य मूर्ती पाहून मन अत्यंत आनंदात शांत झाले. वाटले, या साधूची एक तसबीर आपणाकडेही असावी.

पण तशी तसबीर सर्वत्र शिरडीत मला कोठेही मिळेना. अखेर ज्या घरी मी उतरलो होतो त्या घरी मला हवी होती तशी तसबीर भिंतीला टांगलेली दिसली. ती त्या गृहस्थांकडे मागावी की न मागावी या विचारातच माझा एक तास गेला. अखेर मनातील संकोच वगैरे सर्व सोडून मी त्यांच्याकडे शब्द टाकला. तेव्हा ते म्हणाले बाबांनी परवानगी दिली तर ती तुम्ही खुशाल घेऊन जा.

अखेर बाबांनी त्यांना तसबीर देण्यास परवानगी दिली. तीच ही तसबीर.

त्या सज्जन गृहस्थांनी मला फार प्रेमाने वागविले. ही तसबीर मला दिली. ते गृहस्थ बाबांच्या विशेष मर्जीतील असावेत. कारण बाबा त्यांना फार जोखमीची, विश्वासातील कामे सांगत होते. शामा, शामा म्हणून त्यांना एकसारखे जवळ बोलावीत होते. बाबांचे दर्शन तेवढ्या गर्दीतही ह्यांनीच मला घडविले."

त्या गयावळाने सांगितलेली ही हकिगत ऐकून अप्पा कोते पाटील हसू लागले. न राहावून त्या गयावळाला म्हणाले, "हेच काय ते शामराव! आपल्या पुढेच बसलेले! बाबांच्या गळ्यातील सोन्याचे ताईत आहेत हे ताईत! बाबा आमच्या शिरडीचे राजे! हे शामराव आमच्या शिरडीचे युवराज!

अप्पा कोते पाटील आणखी काही बोलणार तोच त्या गयावळाने शामरावांना कडकडून मिठी मारली. म्हणाला, "शामराव, बाबांची लीला खरोखर अगाध आहे. तुमच्या रूपाने आज प्रत्यक्ष बाबाच माझ्या घरी आले. आता तुमचे माझे नातेच बदलले. तुम्ही एक यात्रेकरू नव्हे. माझे बंधु, सुहृद, जिवलग आहा..."

आकस्मिक निर्माण झालेल्या या नात्यामुळे मास्तर अक्षरशः भारावून गेले.

काय बोलावे हे त्यांना सुचेना. बाबांची कृपा आनंदाश्रूंच्या रूपाने पुन्हा खळाखळा वाहाणार असे त्यांना वाटले. ते टाळण्यासाठी त्यांनी विषय बदलला. दारातच उभ्या असलेल्या दाराकडे बोट दाखवून ते त्या गयावळाला म्हणाले, " हे करतील ना माझे एक लहानसे काम ?

काहीतरी निमित्त काढून मास्तरांनी तेथून काढता पाय घेतल्यानंतर अप्पा कोते पाटील त्या गयावळाशी बोलत बसले. काशी, अयोध्या, मथुरा या ठिकाणी झालेल्या आपल्या वास्तव्याबद्दल त्यांनी सविस्तर हकिगत सांगितली. मग आपण दोघे शिरडीहून किती आकस्मिकपणे निघालो याची हकिगत ते सांगू लागले. म्हणाले—

" बाबांच्या एका भक्ताच्या मुलाची मुंज नागपूरला होती. दुसऱ्या भक्ताच्या मुलाचे लग्न ग्वाल्हेरला होते. दोघेही जीवश्च कंठश्च मित्र. तेव्हा त्यांनी आपसात विचार केला : मुंजीस जाऊन त्याचवेळी लग्नही साधता यावे, असे थोडे अंतराचे मुहूर्त आपण धरू.

तसे मुहूर्त त्यांनी धरले. शिरडीस बाबांना निमंत्रण करण्यास आले. तेव्हा बाबा दोघांनाही म्हणाले, " माझ्या शाम्याला न्या ! "

नानासाहेब चांदोरकर ' बरे ' असे म्हणाले. काकासाहेब दीक्षित मात्र हट्ट घेऊन बसले. म्हणाले, " बाबा, लग्नाला तुम्ही स्वतःही आले पाहिजे ! "

यावर बाबा तावडतोब म्हणाले : ' बंड्या ! अरे, मला यायला काय उशीर ! काशी–प्रयाग वगैरे करून मी शाम्याच्याही अगोदर येतो की नाही बघ ! '

होता होता या शामरावांचा निघण्याचा दिवस जवळ आला.

त्या दिवशी शामरावांनी सर्व तयारी केली. खर्चासाठी म्हणून गावातील नंदलाल मारवाड्याकडून शंभर रुपये आणून ठेवले. मग जेवता जेवता त्यांना सहज विचार सुचला की मी ग्वाल्हेरीपर्यंत जाणार, मग काशी तेथून कितीशी दूर आहे ! तर तसेच करावे. बाबांची आज्ञा झाल्यास काशी–गया यांची यात्रा उरकून सर्व धर्मकृत्ये करून यावे.

पण पुन्हा मन साशंक झाले. दासगणू म्हणून बाबांचे एक भक्त आहेत त्यांची गोष्ट आठवली. "

दासगणूंच्या त्या गोष्टीविषयी त्या गयावळाला उत्सुकता दिसली म्हणून अप्पा कोते पाटील ती गोष्ट मध्येच सांगू लागले. म्हणाले, " गंगा आमच्या शिरडीपासून किती दूर ? फक्त नऊ मैलांवर. पण पर्वणीच्या दिवशी दासगणूंना बाबांनी गंगेवर स्नानास जाण्याची परवानगी काही दिली नाही. म्हणाले : गणू, गंगास्नानासाठी इतके दूर जाण्याचे आपणास कारण काय ? आपली काशी–गया–प्रयाग सर्व काही येथेच ! प्रचीती पाहायची आहे तुला ? करायचे आहे या प्रयागतीर्थात स्नान ! "

दासगणूंनी बाबांच्या चरणी मस्तक ठेवले.

आणि काय आश्चर्य, बाबांच्या पायांच्या दोन्ही आंगठ्यांमधून गंगा-यमुना अकस्मात प्रकट झाल्या. झुळझुळ पाझरू लागल्या.

त्या दोन पवित्र जलधारा पाहून दासगणू गहिवरले. भक्तिप्रेमाने अंतःकरण उचंबळले. वाणी तेजस्वी होऊन तिला काव्य स्फुरू लागले—

अगाध शक्ति अघटित लीला तव सद्गुरूराया ।
जडजीवाते भवि ताराया तू नौका सद्या ॥ धृ० ॥

अप्पा कोत्यांनी ते सबंध गीतही कदाचित म्हटले असते. पण त्यांच्या ध्यानी आले की समोर असलेल्या व्यक्तीला मराठी भाषा नीटशी येत नाही. साहजिकच ओठावर असलेले ते गीत आवरून पुढील हकिगत-ते सांगू लागले. म्हणाले, " तर मी काय सांगत होतो ? बाबा आपणास काशीयात्रेची परवानगी देतील किंवा नाही याविषयी मास्तर साशंक झाले.

पण बाबांच्या सर्वच लीला अघटित. बाबा मास्तरांना म्हणाले : तू मला यात वावगे तरी काय विचारलेस ? काशीस जातो म्हणतोस, तर जा की ! जे सहजच घडण्यासारखे आहे ते बेशक पदरात पाडून घ्यावे. "

बाबांची अशी आज्ञा मिळाल्यानंतर मास्तरांचा आनंद काय वर्णावा ! त्यांनी एक गाडी केली. सरळ कोपरगाव रेल्वे-स्टेशनाची वाट धरली.

पण योग कसा असतो पाहा ! नातीला घेऊन चांदवडाहून मी येत होतो. शिरडी अगदी समोरच होती. तोच गाडीत बसून चाललेले मास्तर मला दिसले.

साहजिकच माझा टांगा थांबवून मी त्यांच्याशी बोलू लागलो.

का, कोठे वगैरे चौकशी करता कळले की मास्तर काशीयात्रेला चालले आहेत !

काशीयात्रा म्हणताच माझा जीव हुरळला. ' बरी सोबत झाली. येऊ का मीही तुमच्याबरोबर ?' असे मी थट्टेने म्हणालो. तर मास्तर मला म्हणाले: अप्पा, ही थट्टेची वेळ नव्हे. येणार असाल तर खरेच चला. बाबांच्या कृपेने तुमची सर्व व्यवस्था होईल. भाड्यापुरते पैसे आता माझ्याकडे आहेत. नंतर गावाकडून तुम्हांला नागपुरा-सही पैसे मागवून घेता येतील. पाहा. मी म्हणातो त्याचा विचार करा.

मी विचार केला : आपण आता पिकले पान झालो. पुढचे कोणी सांगावें ! आज सोबत मिळाली आहे. तर काशीयात्रा पदरात पाडून घ्यावी.

आणि तुम्हांला सांगतो, मी दुसरा काही एक विचारच केला नाही. नातीला शिरडीस घरी पाठवून दिली. मास्तरांच्या गाडीत बसलो. थेट निघून कोपरगाव रेल्वे स्टेशनवरच आलो.

मास्तरांना मी म्हटले : मास्तर, आपली गाडी निघून तर गेली नसेल ना ? तेव्हा मास्तर मोठमोठ्याने हसून मला म्हणाले : आप्पा, शिरडीत आल्यापासून निमगाव, रुई आणि रहाते या तीन गावांच्या पलिकडे बाबा कधी गेले का ? आगगाडी तरी आयुष्यात त्यांनी कधी पाहिली का ? पण मी तुम्हाला सांगतो : सर्व आगगाड्यांच्या जाण्याच्या आणि येण्याच्या वेळा शिरडीत बसून बाबांना तोंडपाठ आहेत ! मग गाडी चुकेल कशी ? कधीच चुकणार नाही आणि खरोखरच तुम्हांला सांगतो, त्या दिवशी गाडी लेट होती ! लेट आली !

गाडीत चढता चढता मास्तर मला म्हणाले : आप्पा, तुम्ही गाडीत चढला ना ? आता काशीयात्रा करवून तुम्हांस सुखरूप परत आणण्याची जबाबदारी बाबांवर ! तुम्ही आता तरी निर्धास्त राहा. डोळे मिटून चला !

गाडीत बसल्या बसल्या माझे डोळे भरून आले. मास्तरांना मी म्हणालो : मास्तर, तुम्ही काही म्हणा--काशीयात्रा करण्याची माझी किती वर्षांची इच्छा ! ती एकट्या बाबांनीच जाणली ! आणि कल्पनाही नसताना सोबतीसाठी तुमची गाठ घालून देऊन मला या आगगाडींत स्वतःच्या हाताने बसवून दिले !"

● ● ●

# शिरडी–रामनवमी उत्सव कार्यक्रम

श्री सच्चिदानंद सद्गुरुसाईनाथ महाराज शिर्डी यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणें दि. १२–४–७५ ते दि. २१–४–७५ पर्यंत तीन दिवस थाटात साजरा झाला. संस्थानचे मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठक साहेब यांनी उत्सवाचे तयारीसाठी सर्व खाते-प्रमुखांची एक महिना अगोदर सभा घेऊन सर्व कामाचा व खर्चाचा विचार-विनिमय करून कामाची योजना आखून दिल्याप्रमाणे मांडवाचे काम, पाणपोई, संरक्षण, साफसफाई, दिवाबत्ती, लाऊडस्पीकर, कलाकारांची हजेरी, वाजंत्री, सनई, चौघडा, अन्नदान वगैरेची व्यवस्था उत्तम प्रकारे ठेवण्यात आली होती.

उत्सवाचा पहिला दिवस:—दि. १९–४–७५ रोजी शनिवारी नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे फोटोची व चरित्रग्रंथाची पहाटे ६ वा. मिरवणूक गुरुस्थान मार्गे श्रींच्या द्वारकामाईत गेली त्या ठिकाणी चांदीच्या भव्य सिंहासनावर श्रींच्या फोटोची स्थापना करून साईचरित्र अध्याय वाचनास सुरुवात झाली. दुपारी ४–३० ते सायंकाळी ६–३० पर्यंत ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज नांदेड यांचे किर्तन झाले. रात्रौ ७–३० ते ९ व ९–३० ते ११ वाजेपर्यंत श्री. प्रभुदेव सरदार मुंबई यांचे गायन झाले. रात्रौ ९–१५ ते ११–३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून काढण्यात आली. मिरवणुकीचे वेळी स्थानिक लोकांनी गारुड भारुड कार्यक्रम केले व पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून नकलांचे कार्यक्रम केले. त्यानंतर वाद्याच्या गजरांत पालखी समाधी मंदिरात आली व शेजारती झाली.

उत्सवाचा मुख्य दिवस:--दि. २०–४–७५ रविवार मुख्य दिवस व रविवारची सुटी त्यामुळे श्रींच्या दर्शनासाठी पहाटेपासून रांगा लागल्या होत्या. नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींच्या फोटोची व साईचरित्र ग्रंथ वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून समाधि मंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणुकीचा मोठा कार्यक्रम झाला. गावातील भाविक मंडळी व बाहेरगावाहून आलेले साईभक्त कोपरगाव मुक्कामी रात्री जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन ९ मैल पायी चालत आले. सकाळी ६–३० वाजता मा. रिसीव्हरसाहेब यानी कावडीची पूजा केल्यावर अंदाजे आठ नऊशे कावडींची भव्य मिरवणूक वाजत गाजत गावातून आली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधीस स्नान घातले. हा कार्यक्रम दोन तास चालला होता.

सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० पर्यंत ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे रामजन्म आख्यान कीर्तन झाले. सायंकाळी श्रींच्या निशाणाची व

त्याची मिरवणूक निघाली. रात्री ७–३० ते ११ पर्यंत सौ. मधुबाला चावला मुंबई यांचे गायन झाले. ११ ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्तांना दर्शनासाठी रात्री खुले ठेवले होते. गावाबाहेर शोभेचे दारुकाम झाले.

उत्सवाचा तिसरा दिवस :—दि. २२–४–७५ सोमवार :–नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी १०–३० ते दुपारी १२–३० पर्यंत ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे गोपाळ काला कीर्तन झाले. दहिहंडी, माध्यान्ह आरती झाल्यावर सर्वांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्री ७–३० ते १० वाजेपर्यंत श्री. नाथ नेरळकर औरंगाबाद, यांचे गायन झाले. त्यानंतर शेजारती होऊन उत्सव समाप्त झाला.

माननीयांच्या भेटी :—

१) श्री. मुदलीयार IAS. डायरेक्टर एम्लॉयमेंट एक्चेंज मध्यप्रदेश.

२) श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई.

३) श्री. मलहोत्रा, ले. जनरल आर्मी विभाग.

४) श्री. जासी. कलेक्टर, मुंबई.

५) श्री. सुंदरम् IAS. जिल्हाधिकारी, अहमदनगर.

६) श्री. श्रीनिवास पाटील, प्रांत ऑफिसर संगमनेर.

**हवापाणी :** शिर्डी येथे कडक उन्हाळा सुरू झाला आहे. सायंकाळी ७ नंतर हवेत थोडासा गारवा असतो.

---

शिरडीवृत्त एप्रिल १९७५ चा मजकूर जागेच्या अभावी या अंकात देता आला नाही, तो पुढील अंकात देऊ.

आ.
—संपादक

---

Regd. No. MH/BYE/6

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४″ × २०″ | रु. १-५० | ८″ × १०″ | रु. ०-५० |
| १०″ × १४″ | रु. १-०० | २½″ × ३½″ | रु. ०-२० |
| ४½″ × ५½″ | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉकावरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ” ” | १-२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ” | २२.८६ × ३३.०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ” ” | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** ‘साई निकेतन’, डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.